पुणे, किशोर–वर्ष ५२, अंक ३ रा, मार्च २०२३ (मासिक) – किंमत रु.७/– पृष्ठे–५२.
Pune, Kishor - Vol.52, Issue 3, March, 2023 ( Monthly ) - Rs. 7 /- Pages -52

# किशोर

मार्च २०२३



# रानातली रंगपंचमी

शिवराज जामोदे

अहा! रंगली रंगली
रंगपंचमी रानात
पानांची ती सळसळ
घुमते माझ्या कानात

गर्द केसरी फुलांनी
फुलूनी पळस येतो
जाणाऱ्या येणाऱ्यावरी
रंग बघा उधळतो

नवरीसारखी नटते
काटेसावर लाल
मोहूनी घेती सर्वांना
तिचे लाल लाल गाल

धुंद नाचत नाचत
पांगारा असा फुलतो
पाखरे घालती शीळ
रंगात प्रीतीच्या नाहतो

रानात रंगतो सोहळा
रंग आणिक गंधाचा
निनादती सप्तसूर
मेळा जमतो पक्ष्यांचा

झाडे रानावनाची
रंगात रंगूनी जाती
हासत, नाचत, डोलत
गाणे सृष्टीचे रे गाती

रानातल्या लक्ष वाटा
रंगूनी जाती रंगांनी
तांबडी-तांबडी माती
गंधित होते फुलांनी

पिवळी, निळी, पांढरी
गुलाबी, लाल, जांभळी
फुले शेकडो रंगांची
किती आगळीवेगळी

डोळ्यांचे पारणे फेडती
सोहळे सहा ऋतूंचे
हातामध्ये हात घेऊ
उधळू रंग आनंदाचे

संपर्क : ९२८४३९१३१०

मार्च २०२३, वर्ष ५२ वे, अंक ३ रा, फाल्गुन-चैत्र, शके १९४४-४५

# किशोर

**संपादक :**
कृष्णकुमार पाटील, संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

**प्रकाशक :**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक
निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई

**निर्मिती अधिकारी :**
हेमंत बाबर

**अक्षरजुळणी :** किशोर विभाग

**कार्यकारी संपादक :**
किरण केंद्रे

**वितरण व्यवस्थापक :**
जालिंदर पाटील

**मुखपृष्ठ पेंटिंग**
डॉ.सुहास सरवदे

**चित्रांकन :**
श्रीनिवास प्रभुदेसाई, घनश्याम देशमुख, योगिता धोटे, माईंडइट संवाद, धनश्री केळकर, राजेंद्र गिरधारी, अजय विभुते, गणेश ढवळे, जैत्र डिजिटल, अमृता ढगे, निकिता वैद्य

## अंतरंग


- रानातली रंगपंचमी — शिवराज जामोदे — ०२
- घमेल्यांची गंमत — मेघश्री दळवी — ०६
- अट्टम गट्टम — अनुजा चवाथे — ११
- रामभरोसे 'अशुभ बोल्या' — श्रीकांत बोजेवार — १२
- हिवाळ्यातले तरंग — वैभव गिलाणकर — १६
- कपडे फळभाज्यांचे — सुरेखा कटारिया — १९
- केसरीची हार — अनुवाद-सुनिता कट्टी — २०
- मोबाईलेरिया — चारुलता पाटील — २३
- फुलपाखरू — दिवाकर ठोंबरे — २४
- डिझेलगाडी — शेख शफी बोल्डेकर — २६
- ती आहे गंगा नर्मदा — सुमती पवार — २९
- कथा सद्गुणाची- झाडांची भाषा — मनोज बोरगावकर — ३०
- कडधान्यांची गोष्ट — एकनाथ आव्हाड — ३३
- वृक्षवल्ली आम्हा सोयरे — अशोक लोटणकर — ३४
- कुतूहल — अमित डहाळे — ३८

**बालविभाग**

- भावी आधारस्तंभ — ४०
- उमलती प्रतिभा — ४२
- चित्रकथा — घनश्याम देशमुख — ४४
- आभाळाच्या मुली — भानुदास धोत्रे — ४६

**ENGLISH SECTION**

- Anger... — Atul N. Shirude — 47
- The Unknown Guest — Anita Dadhe — 48
- Puzzle — 50


ऑनलाईन वर्गणीकरिता : www.kishor.ebalbharati.in

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/- मनिऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

**पत्रव्यवहाराचा पत्ता: कार्यकारी संपादक, किशोर, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,**
सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११००४ संपादकीय : ०२०- २५७१६१०७ वितरण व तक्रार : ०२०-२५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in

## प्रिय किशोर

नव्याने भेटतो महिन्यावारी ;
घडवितो रोज ज्ञानाची वारी.
चित्रकोडे तर खूपच भारी ;
खाजवता डोके मजा न्यारी.
कुतूहल जागते घटनेपाशी ;
होते झक्कास मैत्री विज्ञानाशी.
कथा-कविता आनंद भरती ;
उडतो खुशाल माळरानावरती.
मग सामान्यज्ञान भूल पाडते ;
मन ऐटीत आभाळी खुलते.
म्हणुनी जमते गट्टी चिक्कार ;
दोस्त साजे माझा 'किशोर'....

**संजय ज.गावंडे**
जि.प.प्राथमिक शाळा,रामसिंगनगर
पो.गावंडगांव ता.पातूर जि. अकोला
संपर्क : ९६७३५३७४०६

हितगुज

# जंगल म्हणजे ऑक्सिजन! जंगल म्हणजे जीवन !

२१ मार्च हा दिवस दरवर्षी ‘आंतरराष्ट्रीय वन दिन’ म्हणून जगभरात साजरा केला जातो. हा दिवस विविध प्रकारच्या जंगलांच्या सन्मानाचा दिवस आहे. आपल्या आसपास असणारी वने, देवराया, जंगले ही आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहेत. वनांशिवाय मानवी जीवनाची कल्पना करताच येत नाही. तुम्ही एकदा नुसती कल्पनाच करून पहा ना ! जंगलांशिवाय किती निरस आणि कोरडे होईल आपले आयुष्य ! अगदी कोरड्याठक्क रखरखत्या वाळवंटासारखे ! तुमच्या आसपासचे किंवा तुमच्या आवडत्या कथा, कविता, गाणी, चित्रं, सिनेमे, टीव्ही मालिका यातून अचानक जंगल गायब झाले तर? ऑक्सिजनशिवाय आपल्याला जगण्याची कल्पना तरी करता येईल का ? जंगल म्हणजे ऑक्सिजन! जंगल म्हणजे जीवन !

संत तुकाराम महाराज आपल्या अभंगात ‘वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे’ असे म्हणतात. संत तुकाराम महाराजांचे हे म्हणणे किती मौलिक आहे ना ! भारतासारख्या कृषिप्रधान देशात तर हिरव्यागार वनांचे विशेष महत्त्व आहे. भारतातील ग्रामीण लोकसंख्येचा महत्त्वपूर्ण भाग जंगलावर अवलंबून आहे. किंबहुना त्यांचे जीवनच जंगलांनी सुखी आणि समृद्ध केले आहे. पर्यायाने ग्रामीण भागातील लोकांवर अवलंबून असणाऱ्या शहरी लोकांचे आयुष्यदेखील याच स्वच्छ, सुंदर जंगलांनी सुखद केले आहे. अमेरिका, रशिया, जर्मनी या सारख्या प्रगत राष्ट्रांच्या आर्थिक व सामाजिक भरभराटीत समृद्ध वनांनी फार मोठा हातभार लावला आहे. सुमारे ६० हजारांपेक्षा जास्त वृक्षांच्या प्रजाती तसेच जगातील ८० टक्के पशुपक्ष्यांचे घर जंगलेच आहेत. अनेक अतिदुर्मीळ प्रजातींना निवारा देण्याचे, त्यांचे संवर्धन करण्याचे काम वने करतात. आजघडीला जगभरात सुमारे १.६ अब्ज लोक अन्न, निवारा, ऊर्जा, औषधे आणि उत्पन्नासाठी जंगलांवर थेट अवलंबून आहेत. इंधन, चारा, बांबू आणि लाकूड ही सर्व मालमत्ता जंगलेच आपल्याला प्रदान करतात.. तेही मोफत! त्या बदल्यात त्यांची कुठलीही अपेक्षा ते बोलून दाखवत नाहीत.

जंगल आपल्यासाठी काय करत नाही ते सांगा...वने हवा स्वच्छ ठेवण्याचे महत्त्वपूर्ण काम करतात. हवामान बदलास कारणीभूत ठरणाऱ्या हरितगृह वायूंना शोषून घेण्याचे तसेच जागतिक तापमानवाढ व ओझोन वायूचे सातत्याने कमी होणारे थर नियंत्रित ठेवण्याचे काम देखील वनांकडून केले जाते. या अर्थाने वने जणू नैसर्गिक फिल्टरच आहेत. स्वच्छ हवेसोबत स्वच्छ पाणी देण्याचे, आपणास निरोगी ठेवण्याचे कामदेखील वनेच करतात. संयुक्त राष्ट्राच्या एका अभ्यासानुसार आपल्याला सुमारे २५ टक्के औषधे वनांपासून मिळतात. मात्र चंगळवादी जीवनशैलीसाठी केल्या जाणाऱ्या बेसुमार जंगलतोडीमुळे आपण कुठले गंभीर संकट ओढवून घेत आहोत याची माणसांना कल्पना नाही असे नाही. पण स्वतःच्या फायद्यासाठी ते याकडे सोईस्कर डोळेझाक करत आहेत. अर्थात याकरिता सर्वच मनुष्यप्राणी जबाबदार नाही म्हणून अनेक सज्ञानी, विचारी व संवेदनशील माणसे निसर्गाचा समतोल ढासळत असल्याचे पाहून जंगले वाचवण्यासाठी पुढे आली आहेत. आपापल्या परीने वने, देवराया, जंगले वाचवण्यासाठी जीवाचे रान करत आहेत. समाजामध्ये जनजागृती करत आहेत. लोकसहभाग वाढवत आहेत.

तुम्हीदेखील विविध प्रकारच्या जंगलांचे महत्त्व आणि त्यांची आवश्यकता याबाबत आपल्या कुटुंबात, शाळेत, गावात जनजागृती करा. आपल्या आसपासच्या लोकांना झाडे लावण्यास आणि ती मनापासून वाढवण्यासाठी प्रोत्साहित करा. जंगल है तो सब मंगल है...

**किरण केंद्रे**
**कार्यकारी संपादक**

# घमेल्यांची गंमत

मेघश्री दळवी



बेल वाजली म्हणून दरवाजा उघडला. बघते तर अनिका आपल्या मित्रमैत्रिणींचा मोठ्ठा चमू घेऊन घरात घुसली.

''अगं, खेळायला गेली होतीस ना आत्ताच?''

''आई, समोर बघ ना काय मस्त धमाल चाललीय!''

''मावशी'', अनिकाची मैत्रीण संचिता चिवचिवली. ''समोर बिल्डिंगचं बांधकाम चाललंय ना, तिकडे आम्ही आज घमेल्यांची गंमत बघितली.''

आमच्या समोरच एक नवी इमारत उभी राहत होती. तिचा पाया खणण्यापासूनचा सगळा प्रवास ही मुलं मोठ्या कौतुकाने बघत होती. माती, वाळू, सिमेंट, लोखंडी सळ्या या गोष्टी त्यांना बऱ्याच नवलाईच्या होत्या. आम्ही या भागात राहायला आल्यापासून पहिल्यांदाच असं बांधकाम या मुलांना दिसत होतं. तेव्हा घरी रोज काहीनाकाही सांगत येत होते सगळे. अनिकासुद्धा.

रेडी सिमेंट मिक्स, आरसीसी, स्लॅब, पिलर – अशी मोठ्या माणसांची भाषादेखील या मुलांच्या तोंडी हळूहळू ऐकायला यायला लागली होती. शिवाय तिथल्या कामगारांच्या मुलांना खेळायला बॉल दे, खायला बिस्कीट दे, अशा त्यांच्या करामतीही सुरू झाल्या होत्या.

''मावशी, आज तिथल्या मुली लहान लहान घमेल्यांनी खेळतायत. बघा ना तुम्ही पण'' – ऋग्वेदने मला ओढून खिडकीपाशी नेलं. तोवर आमची अनिका आतल्या खोलीत पळाली होती.

समोर खरोखरच आगळंवेगळं दृश्य होतं. बांधकामावर काम करणाऱ्या बायका जवळजवळ उभ्या राहून माती-खडीने भरलेली घमेली एकमेकांकडे देत होत्या. काही लहानग्या मुली ॲल्युमिनियमची छोटी भांडी घेऊन त्यात थोडी खडी भरून मोठ्यांची नक्कल करत होत्या. मध्येच त्या ही भांडी मोठ्या बायकांकडेही देत होत्या, आणि अगदी मजेत खिदळत होत्या. त्यांच्या आया-मावश्या पण गमतीत ही छोटी घमेली आपल्या मोठ्या घमेल्यांवर रचत होत्या. एखाद्या मनोऱ्यासारख्या. मग हसत हसत हे मनोरे त्या पुढे पुढे सरकवत होत्या.

मलाही बघून मजा वाटली. मुलं काय काय करतील नेम नाही! जे बघतात त्यातून आपले खेळ देखील तयार करतात हे खरं!

''मावशी, मोठ्या घमेल्यांवर लहान घमेली रचता येतात. पण खाली लहान घमेलं आणि वर मोठं, असं नाही होऊ शकत. हो ना?''

''हो ना, कलंडून जातील ती! पण ही अनिका कुठे गेली?''

''मावशी, ती आम्हांला ब्रह्माच्या मनोऱ्याचा खेळ दाखवायला घेऊन आली.'' ऋग्वेद उत्साहात म्हणाला.

''अरे हो! मी तर तो विसरलेच होते!'' माझ्या तोंडून पटकन निघून गेलं. मग शोधाशोध करून आम्ही तो खेळ शोधून काढला.

म्हटलं तर हा साधा खेळ. छोट्या मुलांसाठी एकावर एक कड्यांचं असं खेळणं मिळतं ना, तशा तीन काठ्या घेऊन खेळायचा खेळ. अनिका सहा-सात वर्षांची असताना आम्ही तिच्यासाठी खास बनवून घेतला होता. एका मोठ्या आडव्या ठोकळ्यावर तीन उभ्या लाकडी काठ्या, आणि त्यातल्या एका काठीवर रचलेली लहान-लहान होत गेलेली पाच कडी. आता झिजलेला, रंग उडालेला तो खेळ बघून मी जुन्या आठवणीत रमले.

अनिका मात्र आपल्या नव्या मित्रमैत्रिणींना तो खेळ

दाखवण्यात गुंगून गेली होती.

''संचिता, आता काय करायचं माहिताय का, हा कड्यांचा मनोरा पहिल्या काठीवरून तिसऱ्या काठीवर न्यायचा. जसाच्या तसा. म्हणजे खाली मोठं कडं,आणि वर लहान लहान होत जाणारी कडी. आलं का लक्षात? पण त्याला तीन नियम आहेत.'' अनिका मोठ्या कौतुकाने सांगत होती. ''पहिला म्हणजे दर वेळी एकच कडं उचलायचं.''


''सोप्पंय!'' म्हणत रसिकाने वरचं कडं उचललंसुद्धा. ही या ग्रुपमधली सर्वांत छोटी, पाच वर्षांची. तेव्हा सगळे हसायला लागले.

''अगं रसू, दुसरा नियम तर ऐक. उचललेलं कडं फक्त या तीनपैकी एका काठीवरच ठेवायचं, दुसरीकडे कुठे नाही.''

''हे बेस्ट आहे - नाहीतर ही रसू सगळी कडी पसरून ठेवील इकडेतिकडे!'' ऋग्वेद चिडवायला लागला.

''ए, थांब रे रुग्या. तिसरा नियम ऐक. कडी उचलल्यावर एकतर रिकाम्या काठीवर ठेवता येईल, किंवा मोठ्या कड्यावर लहान कडं फक्त ठेवता येईल. लहानावर मोठं चालणार नाही. आलं लक्षात?''

''म्हणजे मघाशी आपण म्हणत होतो की लहान



घमेल्यावर मोठं नाही ठेवता येणार. तसं?''

''हो, तसंच. चला आपण दोन कड्यांनी सुरुवात करूया.''

संचिताने पहिल्या काठीवर दोन कडी ठेवली. मग वरचं लहान कडं उचलून दुसऱ्या काठीवर ठेवलं आणि खालचं मोठं कडं उचलून तिसऱ्या काठीवर ठेवलं. नंतर दुसऱ्या काठीवरून लहान कडं उचलून तिसऱ्या काठीवर मोठ्या कड्याच्या वर ठेवलं.

''झालं!'' खूश होत संचिताने स्वत:च टाळ्या वाजवायला सुरुवात केली.

''किती खेळींमध्ये केलंस सांग?'' अनिकाने विचारलं.

''तीन!''

''करेक्ट. दोन कड्यांना कमीतकमी तीन खेळी लागतीलच. चला, आता तीन कडी घेऊन करूया. खेळी कमीतकमीच पाहिजेत. वाटेल तसं नाही चालणार.''

निहाराने सुरुवात केली. पण मध्येच ती चुकली. मग ऋग्वेद पुढे सरसावला. पण त्याचीपण काहीतरी गडबड झाली. संचिताला मात्र युक्ती पटकन कळली आणि तिने सफाईने तिन्ही कडी तिसऱ्या काठीत पोचवली.

आता कौतुकाने टाळ्या मी वाजवल्या. ''शाब्बास! किती खेळींमध्ये झाली ही करामत?''

''फक्त सात, मावशी! चल चार कड्यांनी ट्राय करूया.'' संचिताला चेव चढला.

पण चार कड्यात ती अडकली. अनिकाने प्रयत्न केला, पण तीही गोंधळून गेली. तेवढ्यात रसिकाला आठवण झाली.

''मावशी, पण याला ब्रह्माचा मनोरा का म्हणतात?''

''त्याची एक गोष्ट आहे. असं म्हणतात की ब्रह्मदेवाने काशीमधल्या एका देवळात अशा तीन काठ्या ठेवल्या आहेत. पहिल्या काठीवर चौसष्ट कडी आहेत. एक एक कडं उचलत याच नियमांनी तिसऱ्या काठीवर सगळी कडी नेऊन ठेवायची आहेत. अशीच – मोठ्यापासून लहान लहान होत गेलेली. तिथे काही साधू केवळ हेच काम करतायत.''

''करतायत? अजून?'' संचिताला खूपच आश्चर्य वाटलं.

''हो. कारण कडी किती आहेत बघ.''

''चौसष्ट. पण ती कडी हलवायला कितीसा वेळ लागणार?''

हे काम किती वेळखाऊ आहे हे अनिकाच्या मात्र लक्षात आलं. ''ए संचू, अगं आत्ता चार कड्यांमध्ये आपण अजून अडकलोय. तर चौसष्ट कडी म्हणजे किती कठीण असेल बघ!''

''कठीण नाहीय खरं तर. त्याची एक ट्रिक आहे. ती लक्षात आली तर करणं कठीण नाही. पण वेळ मात्र लागणारच. भरपूर वेळ लागणार.''

''कसा?'' अनिका विचारात पडली.

''चला, आपण आधी हे चार कड्यांचं काम पूर्ण करूया.'' मी पुढे होत म्हटलं. सुरुवात करून दिल्यावर अनिका आणि संचिताने नीट विचार करून खेळी केल्या. बघता बघता त्यांनी सगळी कडी अगदी व्यवस्थित तिसऱ्या काठीवर पोचवली. अवघ्या पंधरा खेळींमध्ये!

आता बघा – दोन कड्यांना लागल्या तीन खेळी, तीन कड्यांना सात, आणि चार कड्यांना पंधरा. काही लक्षात येतंय का?

''येतंय!'' अनिका उद्गारली. नाहीतरी गणित

म्हटलं की बरोबर चालतं तिचं डोकं.

''आता याच हिशेबाने चौसष्ट कडी असतील तर?''

''दोनचा चौसष्टावा घात वजा एक? बापरे, म्हणजे किती? कोटी? अब्ज?'' अनिकाने डोक्याला हात लावला.

''त्याही पलीकडे! अगं खूप मोठी संख्या आहे ती! लिहायला जागा पण नाही पुरायची इतकी! आणि प्रत्येक खेळीला एक सेकंद लागेल असं धरलं तरी किती वेळ लागेल आलं ना लक्षात? कधीच न संपणारं काम आहे ते!''

''ओह! पण खरंच आहेत का तसे साधू?'' ऋग्वेदने शंका काढली.

''एक गोष्ट आहे झालं. पाश्चात्य देशांमध्ये टॉवर ऑफ हनोई अशी गोष्ट म्हणतात. ते जाऊ दे. ऐकायला छान वाटली की नाही गोष्ट? आणि खेळ मस्त आहे ना?'' मी त्याला विचारलं.

''एकदम मस्त! खाली ते घमेल्यांचा मनोरा करतात ते फक्त तीन घमेली घेऊन म्हणून बरं!''

''हो.'' मी मान्य केलं आणि खिडकीपाशी गेले. खाली छोट्या मुली अजूनही मोठ्या घमेल्यांवर लहान घमेली रचत होत्या.

''आता मला एकतीस खेळींमध्ये ही पाच कडी इकडून तिकडे न्यायची आहेत.'' हसत हसत ऋग्वेद पाच कडी घेऊन प्रयत्न करायला लागला. तेवढ्यात त्याला आठवण झाली, ''मावशी, मावशी, मघाशी म्हणालात ती याची ट्रिक कोणती?''

''ती तुम्हीच शोधून काढायचीय!'' मी हसून म्हणाले. तर आता तुम्ही ती ट्रिक ओळखून दाखवाल का?

**संपर्क : ९८२०१४४६५७**

**या विचित्र प्राण्याला कोणकोणत्या प्राण्यांचे अवयव आहेत सांगा पाहू.**





अनुजा चवाथे




# अट्टम गट्टम

राग पळाले,
डोळ्यांमध्ये हसू नाचले,
झाडांवरती झोके घेता,
हातांना तर
पंखही फुटले।।
गर गर वारा,
सोबत येता,
आभाळावर पाऊल नक्षी;
दऱ्यादऱ्यांतून
उंच उडाले
हे कोणते नवेच पक्षी?।।

झाडं–वेली
इथली–तिथली
फेर धराया उत्सुकली,
फांद्यांच्या या झुल्यांना
कोण चिमुकली बिलगली?
इथली पिकंली, तिथली मिकंली,
इथलं गब्बड, तिथलं अब्बड
रंगीत रंगीत
सारी गडबड,
झाडांमध्ये
रुजू लागली,
तेव्हापासून गोड बडबड.

संपर्क : ९८२००६१००१





भाग–३

# रामभरोसे

## ‘अशुभ बोल्या’

श्रीकांत बोजेवार

कान पूर्ववत झालेला रामभरोसे हुश्श म्हणत घरी आला. त्याचे कान नेहमीसारखे सामान्य झालेले पाहून त्याच्या आईलाही बरं वाटलं. तिनं त्याचा कान धरला आणि म्हणाली, ‘‘राम्या, तुला राजानं चांगली नोकरी दिली आहे लोकांचे तंटे सोडवण्याची, तेवढी नीट कर आता. नसते उद्योग करू नकोस.’’ रामभरोसेनंही शपथ घेतली की यापुढे आपण कामास काम ठेवायचं. आईनं केलेली गरमागरम भाकर सायीच्या दह्यासोबत पोटभर खाऊन तो बाहेर पडला. त्याचे लोंबलेले कान ज्यांनी ज्यांनी पाहिले होते, त्यांना तो आवर्जून आपले नॉर्मल झालेले कान दाखवत होता. राजानं दिलेल्या हुकमानुसार तो गावाच्या मध्यभागी असलेल्या पारावर बसणार होता. त्याच ठिकाणी काही तंटे मिटवायचे आणि तिथं नाहीच मिटले तर त्यांना राजदरबारात पाठवायचं, असं काम त्याला दिलेलं होतं.

रामभरोसे पाराकडे चालला असतानाच त्याला कडुनिंबाच्या झाडाखाली केशा न्हावी आणि तुक्या लोहार दिसले. कडुनिंबाच्या झाडाखाली एका डुगडुगत्या लाकडी खुर्चीत तुक्या बसला होता आणि केशा दाढी करत होता. हिवाळ्याचे दिवस असल्यानं जवळच शेकोटी पेटवलेली होती. राम्यानं ते दृश्य दुरूनच पाहिलं आणि त्याच्या

डोळ्यासमोर भलतंच दृश्य उभं राहिलं– ‘कडुनिंबाच्या फांद्या वाऱ्यानं हलत होत्या. वाऱ्यामुळं शेकोटीतली एक ठिणगी उडून तुक्याच्या धोतरावर पडली आणि त्याचं धोतर पेटलं, दोघांच्याही ते उशिरा लक्षात आलं आणि मग तुक्या सैरावैरा पळू लागला!’ या दृश्याची कल्पना केल्यावर रामभरोसे जाता जाता ओरडला, ‘‘तुक्या, आरं सांभाळून बाबा, शेकोटीपासून दूर राहा, नाही तर धोतर पेटलं लेका तुझं.’’

केशानं ते ऐकलं आणि दाढीच्या वस्तऱ्याला धार काढता काढता तोही ओरडूनच म्हणाला, ‘‘आरं शुभ बोल की रं राम्या.’’ तुक्यानंही ते ऐकलं होतंच. तुक्या केशाला म्हणाला, ‘‘कशाला नसत्या उचापती करतोय हा राम्या.’’

रामभरोसे पाराकडे निघून गेला. केशा त्याच्या कामात रमला आणि दाढी झाल्यावर डोक्याला तेलानं मालीश करून घेता घेता तुक्यालाही जरा गुंगीच आली. थोड्या वेळानं तुक्याला आपल्या पायाशी काही तरी गरम जाणवलं म्हणून त्यानं घाबरून केशाच्या हातून डोकं सोडवून घेतलं. मागे वळून पाहिलं तर त्याच्या धोतरानं पेट घेतला होता आणि आगीच्या ज्वाळा गुडघ्याकडून कंबरेकडे वाढत होत्या. ‘‘आरं आरं, राम्याची जीभ लय काळी हाय, अशुभ बोलून गेला...’’ असं म्हणत तुक्या आग विझवण्याचा प्रयत्न करू लागला, परंतु हवेमुळं ती वाढतच होती. कडुनिंबाच्या झाडामागे गावातला तलाव होता, तुक्यानं धावत जात थेट तलावातच उडी घेतली. आग विझल्यावर केशानं हात देऊन त्याला बाहेर काढलं. दोघंही रामभरोसेला शिव्या घालत घालत पाराकडे गेले. ‘‘तू बोललास ना, म्हणूनच धोतर पेटलं माझं.’’ रामभरोसे म्हणाला, ‘‘पण मी काय केलं, मी तर तुम्हांला सावध केलं होतं.’’ तुक्या




म्हणाला, ‘‘काळ्या जिभेचा आहेस तू.’’ त्यावर रामभरोसेनं आपली जीभ बाहेर काढून दाखवली आणि म्हणाला, ‘‘बघ, छान गुलाबी रंगाची आहे.’’ रामभरोसेच्या जिभेवर एक लहानसा काळा ठिपका केशाला दिसला, पण त्याचं त्याला काही फार वाटलं नाही. असेल काही तरी लागलेलं म्हणून त्याकडे दुर्लक्ष करत केशा–तुक्या तिथून निघून गेले.

चार–दोन तंटे सोडवून संध्याकाळी चहा प्यायला म्हणून रामभरोसे घराकडे निघाला. गावाच्या वेशीजवळ मोठी कमान उभारली जात होती. वरपर्यंत चुना आणि दगड नेण्यासाठी दोरीचा पाळणा तयार केलेला होता. पाळण्यात चुना भरला की वरचा मजूर पाळणा वर ओढून घेत असे. कमान पूर्ण झाल्यावर आपल्या परिसराची शोभा वाढणार याचा रामभरोसेला आनंद झाला. तो कमानीचं काम पाहायला थांबला. मात्र चुना भरून पाळणा वर खेचला जात होता, तेव्हा त्याच्या डोळ्यांसमोर दृश्य उभं राहिलं ते असं– ‘‘पाळण्यात चुन्याऐवजी एक मजूर बसला, वरच्या मजुरानं पाळणा खेचायला सुरुवात केली आणि तो अर्ध्यात असतानाच दोर तुटला..’’

पुढल्याच क्षणाला रामभरोसेला कमानीवर चढलेल्या मजुराचा आवाज ऐकू आला, ''बत्ताशा, आरं आता तू वर ये चढून, मी उतरतो खाली आन् च्या पिऊन येतो.'' मजुरांना चढायला पायऱ्या होत्या, पण बत्ताशा म्हणाला, ''बसू का रं मी पाळण्यात? वढून घेतोस का मला?'' वरच्या मजुरानं मान हलवली, बत्ताशा पाळण्यात बसू लागला. ते पाहून रामभरोसे जोरात ओरडला, ''आरं बत्ताशा, नको बसू पाळण्यात, दोर तुटला तं कितीला पडल तुला?'' बत्ताशानं रामभरोसेकडे पाहिलं आणि म्हणाला, ''आरं मी काय पैल्यांदा बसतो का काय आज?''

रामभरोसे निघून गेला. बत्ताशा पाळण्यात बसला. वरच्या मजुरानं पाळणा वर खेचायला सुरुवात केली, पाळणा अर्ध्यात आला आणि कचकन् आवाज करत एका बाजूचा दोरखंड तुटला. पाळणा लवंडला आणि बत्ताशा तोल जाऊन खाली थेट चुन्यातच पडला. चुन्याच्या गरमीनं त्याच्या अंगाची लाही लाही होऊ लागली, बाकीच्या मजुरांनी त्याला धरून पाण्यात बुचकळला, भराभरा चुना साफ केला, पण तोवर बत्ताशा थोडा भाजला होताच, शिवाय सर्वांग पांढरं होऊन तो एखाद्या भुतासारखा दिसू लागला होता. रामभरोसेला त्यानं सणसणीत शिवी हाणली, ''वंगाळ बोलला की वंगाळ होणारच, काय जिभंला हाडच न्हाय राम्याच्या.''

रामभरोसे घरी चहा पीत असताना त्याच्या कानावर ही गोष्ट गेलीच. त्याला तुक्या काय बोलला होता ते आठवलं, तो म्हणाला होता, 'काळ्या जिभेचा आहेस तू.' चहा पिऊन झाल्यावर त्यानं हळूच आरसा चेहऱ्यासमोर धरला आणि जीभ बाहेर काढून पाहिली. जिभेच्या मध्यभागी त्याला एक काळा ठिपका दिसला.



आपली जीभ तोंडात ठेवताना थोडा त्रास होत आहे, असंही त्याला वाटू लागलं. नाक आणि कानाचा त्रास एकदा सहन केलेल्या रामभरोसेला आता भीती वाटू लागली. आपल्यावर नवीन संकट येऊ घातलं की काय? आता काहीही दिसलं तरी तोंड बंद ठेवायचं, बोलायचंच नाही असं त्यानं मनातल्या मनातच ठरवून टाकलं.

चहा पिऊन झाल्यावर पाराकडे जाताना त्यानं मुद्दामच कमानीकडून जायचं टाळलं. तो दुसऱ्या रस्त्यानं निघाला. जळणासाठी लाकडं आणायला जंगलात गेलेली पाखराबाई त्याला मोळी घेऊन परत येताना दिसली. तिच्या मोळीतलं एक भलं मोठं लाकूड सुटून पडेल की काय असं त्याला वाटलं, त्याला तसं दृश्य डोळ्यांपुढे दिसलंही परंतु त्यानं स्वतःला आवरलं. आपण तिला तसं बोललो आणि नेमकं तसंच घडलं तर पुन्हा आपल्यालाच दोष दिला जाईल, त्यापेक्षा गप्प बसावं, असा विचार करत त्यानं तोंड घट्ट दाबून बंद ठेवलं. पाखराबाई नजरेआड होईपर्यंत तो एकाच जागी शांतपणे उभा राहिला. पण तरीही त्याच्या नजरेसमोर मोळीतून लाकूड खाली पडल्याचं दृश्य पुन्हा पुन्हा येतंच राहिलं. मग मात्र त्याला राहवेना. आजूबाजूला कोणीच नाही हे पाहून तो वाटेत एका जागी थांबला आणि जोरात ओरडला, ''ए पाखराबाई, अगं एक लाकूड सुटत चाललंय मोळीतून तुझ्या, पडलं कुणाच्या अंगावर तर केवढी आफत येईल?'' बोलून झाल्यावर त्याला बरं वाटू लागलं. तो लगबगीनं चालंत पारावर बसला तेव्हा तंटा घेऊन चार जण आलेलेच होते. तो त्यांचे तंटे ऐकू लागला.

जरा वेळानं सावकाराच्या घरचा नोकर सुदामा तळहातावर तंबाखू चोळत आला आणि म्हणाला, ''आरं कळलं का तुला? पाखराबाईच्या मोळीतून लाकूड सुटलं आन् पडलं खाली. कुंभाराचं कुत्र्याचं पिल्लू चाललं होतं तिथून त्याच्याच आंगावर पडलं, पार चेंदामेंदा झालाय बघ पिल्लाचा. कुंभारानं तिची समदी लाकडं घिऊन घरात ठेवली, आन् ती बसलीय रस्त्यात बोंबलत आता.''

सुदामा बोलत असतानाच रामभरोसेनं आपली जीभ बाहेर काढून बोटांना चाचपून पाहिली, त्याला ती थोडी लांब आणि जाड झाल्यासारखीही वाटली. त्यानं बाहेर काढलेल्या जिभेकडे पाहत सुदाम म्हणाला, ''काय रं, जांभळं खाल्लीत की काय तू? पार काळी निळी झाली ना जीभ तुझी.''

आतून घाबरलेला रामभरोसे म्हणाला, ''काहीही नको सांगूस मला, तंबाखू खाऊन काळे झालेले स्वतःचे दात बघ आधी.''

पण रामभरोसेला खात्री होती, आपल्या जिभेला काही तरी होतंय, सुदाम गेल्यावर त्यानं पुन्हा जीभ चाचपली आणि स्वतःलाच विचारलं, 'आपल्या जिभेला हाड नाही, खरंच जिभेला हाड आसतं का माणसाच्या?' घरी गेल्यावर आरसा पाहण्याच्या कल्पनेनं त्याला आताच घाम फुटला होता. सतत काही तरी अशुभ बोलतो म्हणून लोक त्याला लोक आता रामभरोसे अशुभबोल्या म्हणू लागले होते.

(रामभरोसेच्या या नव्या सवयीचा शेवट कसा झाला याची कथा पुढील अंकात)

**संपर्क : ९८९२४१९२६७**

वैभव गिलाणकर

# हिवाळ्यातले तरंग



थंडीचे दिवस असल्यामुळे तितूने उबदार, लोकरीचे कपडे घातले होते. आपल्या मित्रांना भेटायला ती आज नेहमीप्रमाणे त्या तलावाकडे चालली होती. जाताना तिने खाली पडलेला एक छोटासा दगड उचलला व तो चेंडूसारखा झेलत ती इकडेतिकडे बघत चालू लागली. सर्व निसर्गाला हिवाळ्याचा स्पर्श झालेला दिसत होता, झाडांच्या पानांवर बर्फ साचलेला होता, जमिनीमध्ये रुतलेले काळे-करडे खडक ओलेगार झाले होते. जेव्हा तितू तलावापाशी आली तेव्हा तिला दिसलं की अर्धा तलाव आता गोठलेला होता, उरलेल्या भागात शांत, स्थिर पाणी होतं. पण तितूला त्याचं फारसं काही वाटलं नाही, तिने नेहमीप्रमाणे तलावाच्या अजूनही न गोठलेल्या पाण्यात तो मघा उचललेला दगड भिरकावला...

दगड स्थिर पाण्यात पडताच तिथून एकूण सहा तरंग उठले व दाही दिशांना वर्तुळाकार पसरले, ते तरंगच तितूचे मित्र होते. तितूला पाहून ते तरंग पाण्याच्या पृष्ठभागावर उभे राहिले.

''कसे आहात तुम्ही सर्व?'', तितूने गोड हसून विचारलं पण तिला कळलं की ते सर्व तरंग उदासपणे उभे होते.

''काय झालं? तुम्ही सर्व गप्प का?'', तिने काळजीने विचारलं.

''तितू, आता आपली भेट यापुढे होणार नाही,'' सर्व तरंग दुःखी स्वरात एकसुरात म्हणाले, ''हिवाळा अधिकच कडाक्याचा होतोय आणि त्याबरोबर आमचा हा तलावही गोठत चाललाय. जेव्हा पूर्ण तलाव गोठेल तेव्हा पाण्यात तरंग उठूच शकणार नाहीत आणि त्यामुळे आपण कधी बोलू शकणार नाहीत.''

तितूला आता तलाव गोठण्याची नकारात्मक बाजू लक्षात आली. बर्फाच्या पोटात जेव्हा तलावाचं पाणी गडप होईल तेव्हा त्या पाण्याची तरंग उमटवायची शक्तीही निघून जाईल हे तिला कळलं.

''मग... आता यावर उपाय काय?'', तितूने विचारलं.

''यावर कुठलाही उपाय आम्हांला सुचत नाहीये, तरंग खिन्नपणे म्हणाले, जाऊ दे, तितू तू घरी जा. ही आपली शेवटचीच भेट आहे असं समज.''

तितूने जड मनाने तरंगांचा निरोप घेतला आणि ती या समस्येचा विचार करतच घरी पोहोचली. पण घरी पोहोचताच तिला तिच्या बाबांचा आणि एका साळींदराचा संवाद ऐकू आला.

तितूचे बाबा कुलूप बनवण्यात पटाईत होते, त्यांनी बनवलेली कुलूपं कधीही तुटत नसत, ती ज्या घरांना, तिजोऱ्यांना लावलेली होती ती सर्व अगदी सुरक्षित राहत असत. पण आज हा साळींदर तिच्या बाबांना भेटायला आला होता, तो एक गर्विष्ठ जादूगार होता. त्याच्या डोळ्यांमध्ये एक शक्ती होती, तिने तो ज्या कुलपांकडे बघत असे त्या कुलपाची चावी त्याच्या पाठीवरच्या काट्यांमध्ये तयार होत असे. तितूने लपून ऐकलं की तो साळींदर तिच्या बाबांना आव्हान देत होता,

''तुम्ही असं कुलूप बनवा ज्याची चावी मला बनवताच येणार नाही,'' साळींदर गर्वाने म्हणाला, ''आणि ते तुमच्या घराला लावून ठेवा. जर मी ते उघडण्यात अयशस्वी झालो तर पुन्हा कधीही माझं तोंड दाखवणार नाही, पण जर मी ते कुलूप उघडलं तर तुमचं घर माझ्या मालकीचं होईल.''

''असं कुलूप जे तुलाही उघडता येणार नाही?'', तितूचे बाबा गोंधळले, त्यांना साळींदराच्या शक्तीची जाणीव होती, ते नकार देणार इतक्यात तितूच घरात आली आणि ठामपणे म्हणाली,

''मंजूर आहे!''

''ठीक आहे तर'', साळींदर खी-खी हसून म्हणालं, ''चार दिवसांनी मी येईन आणि तुम्ही बनवलेल्या

कुलपाची चाचणी घेईन.''

साळींदर निघून गेल्यावर तितूचे बाबा तिला चिंतेने म्हणाले,

''अगं तितू, त्या साळींदराच्या शक्तीबद्दल–''

''मला पूर्णपणे माहीत आहे, बाबा,'' तितू त्यांना धीर देत म्हणाली.

''मग आपण हे कुलूप कसं बनवणार?''

''माझ्याकडे एक कल्पना आहे,'' तितूने आपली कल्पना बाबांच्या कानात सांगितली आणि त्यांच्याही चेहऱ्यावर स्मित पसरलं.

चार दिवसांनी साळींदर परत आलं आणि त्याने पाहिलं तितूच्या घरावर एक मोठं कुलूप लटकत होतं. कुलपांकडे एकटक बघितल्याबरोबर साळींदराच्या पाठीवरील एका काट्याचं रूपांतर एका सुबक चावीमध्ये झालं, त्याने ती चावी काढली आणि कुलूप उघडलेच या अपेक्षेने खदखद हसत त्या कुलपामध्ये घालणार इतक्यात–

पाण्यात थेंब पडल्यावर तरंग उठतात तशा त्या कुलपातून त्याचं कुलपासारख्या वर्तुळाकार प्रतिकृती उठल्या आणि हवेत विरून गेल्या. कारण तितूच्या कल्पनेनुसार तिच्या बाबांनी तलावातले तरंग त्या कुलपामध्ये मिसळले होते, आता त्यांच्या मर्जीशिवाय ते कुलूप उघडण्याचा कुणी प्रयत्न केलाच तर त्या कुलपातून तरंग उठून तशाच असंख्य प्रतिकृती निघत होत्या जेणेकरून ते कुलूप जबरदस्ती उघडू पाहणाऱ्याला खरं कुलूप कोणतं हे लक्षातच येणार नाही आणि साळींदराच्या बाबतीतही तेच झालं, साळींदराने घातलेल्या चावीने कुलूप तर उघडलं नाहीच पण त्या कुलपाच्या प्रतिकृती मात्र त्याच्यावर हसू लागल्या. साळींदराने चिडून आणखी एक चावी बनवली आणि ती त्या प्रतिकृतींपैकी एका कुलपात घालायचा प्रयत्न केला पण नाही, तोही प्रयत्न फसला. असं करत करत साळींदराच्या पाठीवरचे सर्व काटे वाया गेले पण ते कुलूप किंवा त्यातून उमटणाऱ्या एकही प्रतिकृतीतील कुलूप तो उघडू शकला नाही.

खजील होत व आपली हार मानत साळींदर तिथून निघून गेलं, त्याचक्षणी तितू आणि तिचे बाबा घराबाहेर आले.

''शाब्बास तितू!'', बाबा तिला थोपटत म्हणाले, ''तुझ्या मित्र तरंगांना तू माझ्या कुलपासोबत जोडून त्यांना गोठण्यापासून वाचवलंसच पण त्याचबरोबर माझी मानही अभिमानाने उंचावलीस!''

तितू आणि तिचे बाबा कौतुकाने त्या नव्या 'तरंग कुलपा'कडे बघू लागले आणि तरंगही तितूमुळे नवं घर लाभल्यामुळे आनंदी झाले!

**संपर्क : ८१४९७७३३८५**

**'किशोर' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक विवेक उत्तम गोसावी यांनी सोहेल एंटरप्रायजेस, सर्व्हे नं.४८, घर पट्टी नं.४०२, भांडार्ली व्हिलेज, नॅशनल काट्याजवळ, ठाणे–४०० ६१२ येथे छापून 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे–४११ ००४ येथे प्रसिद्ध केले. ❋ संपादक – कृष्णकुमार पाटील.**

**'Kishor' monthly publication is owned by Bureau of Textbook Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Vivek Uttam Gosavi, Printed at M/s. Sohail Enterprises, S.No. 48, Ghar Patti No. 402, Bhandarli Village, Near National Kata, Thane-400 612 and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune-411 004. ❋ Editor - Krishnakumar Patil.**

# कपडे फळभाज्यांचे


प्रा. सुरेखा कटारिया








सेल!सेल! सेल!
लग्नसराईचा सेल!
फॅशनेबल कपड्यांची
ही फार मोठी रेलचेल
लहान घ्या मोठे
घ्या कपडे स्वस्त
कपड्यांचे भाव ही
एकदम आहेत रास्त
कपड्यांसाठी भाज्यांनी
फळांनी ही केली गर्दी
रूपा रंगात साऱ्यांत
हो फळभाज्या दर्दी
'बटाट्याने' घेतली
खाकी शिपायाची वर्दी
हिरव्यागार पॅन्टमध्ये
'काकडी'ने घेतली गिरकी
'शेवग्याने' निवडली
हिरवी हिरवी साडी
'कोथिंबीरीच्या' फ्रॉकवर
पांढऱ्या फुलांची खडी
'कलिंगडाच्या' कोटावर
शेवाळी शेवाळी चट्टे
'खरबुजाच्या' सुटावर
हिरवे पिवळे पट्टे



'गाजर', 'मुळा' सख्खे
चुलत भाऊ भाऊ
केशरी, पांढऱ्या धोतराला
हिरवे हिरवे काठ लेवू
'वांग्यांचा', माठांचा
'बीटांचा' वेगळा थाट
जांभळ्या, गुलाबी ड्रेसवर
हिरव्या वेलबुट्टीचे काठ
'टोमॅटोने' घेतला
लाल पंजाबी सूट
'भेंडीने' निवडली हिरवी
साडी अन् हिरवेच बूट
'कांद्याने' घेतली गुलाबी
कपड्यांची घडीवर घडी
'लसणाच्या' अंगावर
पांढरी सहावारी साडी
'मेथी','शेपू ','चवळी', 'आळू',
'पालकाचा'तोराच वेगळा
हिरव्या झालरीच्या फ्रॉकीत
लग्नाचा बाजार सगळा

संपर्क : ९८२२७४५०३०.



# केसरीची हार

अनुवाद-सुनिता कट्टी

कर्नाटक राज्यातील विजयनगर साम्राज्याचं नाव कोणाला माहीत नाही? विजयनगर साम्राज्याचे सर्वच राजे पराक्रमी, मुत्सद्दी आणि प्रजाहितदक्ष होते पण त्यातील राजा कृष्णदेवरायाची कीर्ती तर दिगंतात पसरली होती. राज्यात सुखसमृद्धी ओसंडून वाहत होती. राजा प्रजेच्या गळ्यातील ताईत होता.

कृष्णदेवराय आपल्या पूर्वजांप्रमाणे पराक्रमी, मुत्सद्दी तर होताच शिवाय त्याला संगीत, नाट्य, तसेच वास्तुकला अशा ललित कलांचीही चांगली जाण होती. देशोदेशीचे कलाकार त्याच्या दरबारात हजेरी लावत. राजाने केलेल्या मानसन्मानाने कृतार्थ होऊन परत जात. वेगवेगळ्या राज्यातील कारागिरांना बोलावून घेऊन त्याने आपल्या राजधानीला नटवलं, सजवलं होतं. राजधानीचं सौंदर्य पाहायला दुरून दुरून लोक येत. तेथील वास्तुशिल्प पाहून डोळ्यांचं पारणं फिटत असे.

कृष्णदेवरायाच्या ह्या समृद्धीमुळे, लोकप्रियतेमुळे इतर राजे मात्र त्याच्यावर जळफळायचे, त्यातही कोट्टायमचा राजा रुद्रलिंगम त्याचा सर्वात जास्त मत्सर करी. त्यानं दोन-तीनदा विजयनगरवर आक्रमणही केलं होतं पण प्रत्येक वेळेस त्याची जबरदस्त हार झाली होती.

प्रत्येक वेळेस हार झाली की त्याचा जळफळाट आणखी वाढत होता. काही करून त्याला कृष्णदेवरायाला हरवायचं होतं. युद्धात तर तो त्यांना हरवू शकत नव्हता. मग त्यानं एक वेगळाच विचार केला.

रुद्रलिंगमच्या दरबारात राजकेसरी नावाचा एक शक्तीशाली पैलवान होता. तो मल्लयुद्धात पारंगत होता. त्याच्या समोर दुसरा कोणीच पैलवान टिकत नसे. रुद्रलिंगमनं ठरवलं की, आपल्या ह्या पर्वतप्राय, अजेय मल्लाला मल्लयुद्धासाठी विजयनगरला पाठवावं.

एके दिवशी त्यानं खरंच राजकेसरीला कृष्णदेवरायांच्या दरबारात पाठवलं. त्याला वाटलं होतं राजकेसरी विजयनगरच्या पैलवानांना भारी पडेल. त्यांना हरवून येईल पण विजयनगरच्या बाहुक पैलवानापुढं राजकेसरीचे सर्व डावपेच फिके पडले. बिचारा पराभूत होऊन आपल्या राज्यात परत आला.

कुस्तीतील हा पराजय राजकेसरीच्या जिव्हारी लागला होता. आपल्या मल्लवीराच्या पराभवानं रुद्रलिंगमचंही पित्त खवळलं होतं, पण त्यानं स्वत:ला सावरलं. त्याचा राजकेसरीच्या बळावर व मल्लकौशल्यावर खूप विश्वास होता. त्यानं राजकेसरीचं सांत्वन केलं. कुस्तीचा आणखी सराव करायला सांगितलं.

दोन वर्षांनी विजयनगरचा शाही पैलवान बाहुक मरण पावला. रुद्रलिंगमनं लगेच राजकेसरीच्या कानांवर ही बातमी घातली. त्याची पाठ थोपटत म्हणाला, राजकेसरी बाहुक मरण पावल्याची खबर आहे. आता तुला आधीच्या पराभवाचं उट्टं भरून काढायची संधी आहे. विजयनगरचा एकही पैलवान तुझा मुकाबला करू शकणार नाही. जा आणि विजयनगरच्या पैलवानांना तुझ्याबरोबर कुस्ती खेळायचं आव्हान दे.

विजयनगरच्या दरबारात येऊन राजकेसरीनं तिथल्या पैलवानांना त्याच्याबरोबर कुस्ती खेळायचं आव्हान दिलं. त्याचं राक्षसासारखं काळ कुळकुळीत, बलदंड शरीर पाहून विजयनगरच्या पैलवानांचं अवसानच गळालं. पण तरीही बाहुकच्या चेल्यानं सगळं बळ एकवटून राजकेसरीचं कुस्तीचं आव्हान स्वीकारलं.

आपल्या गुरूनं शिकवलेल्या डावपेचांचा पुरेपूर उपयोग करीत बाहुकचा शिष्य खूप चांगल्या प्रकारे कुस्ती खेळला. पण शेवटी राजकेसरीनं असा काही अवघड पेच टाकला की बाहुकच्या शिष्याची पाठ जमिनीला टेकली. गर्वानं मान ताठ करीत राजकेसरीनं विचारलं, 'आहे का कोणी आणखी माईचा लाल? असेल तर ये बाबा आखाड्यात. तुलाही माझा प्रसाद देतो.'

राजकेसरीचं हे आव्हान ऐकून विजयनगरचे पैलवान एकमेकांच्या तोंडाकडे पाहू लागले. पण मैदानात उतरायची एकाचीही हिंमत झाली नाही.

इतक्यात कुस्तीच्या फडात राजा कृष्णदेवराय आले. त्यांना तिथली हकीगत कळली. ऐकून त्यांच्या भुवया ताणल्या गेल्या. धीरगंभीर आवाजात त्यांनी विचारणा केली, 'काय? राजकेसरीचं आव्हान स्वीकारणारा एकही पैलवान आमच्या राज्यात नाही?'

राजाचा बुलंद आवाज ऐकूनही कुणी पुढं आला नाही. तेव्हा थोडा विचार करून कृष्णदेव राय म्हणाले, ''राजकेसरी, तुझं आव्हान स्वीकारलं जाईल. आमच्या

राज्यात आणखी एक जिगरबाज पैलवान आहे. सध्या तो बाहेरगावी गेला आहे. संध्याकाळपर्यंत येईल इथं. उद्या तो तुझ्याबरोबर कुस्ती खेळेल.'' आणि कृष्णदेवरायांनी सगळ्यांना तिथून निघून जायला सांगितलं.

दुसऱ्या दिवशी परत कुस्ती पाहायला लोक जमले. तिथं आधी कधीही न पाहिलेला नवीनच पैलवान षड्डू ठोकत उभा होता. त्याची शरीरयष्टी राजकेसरीच्या निम्म्यानं होती पण चाल चित्त्याच्या चालीसारखी तडफदार, वेगवान होती. छाती पुढं करून तो राजकेसरीच्या समोर आला. त्याच्या हातात आपला हात देऊन म्हणाला, ''आज मी तुमच्याशी कुस्ती खेळीन.'' त्याचं हे बोलणं ऐकताच आखाड्यात टाळ्यांचा एकच कडकडाट झाला.

आता सगळ्यांचं लक्ष राज कृष्णदेवरायांच्या आगमनाकडं होतं. पण राजमहालातून एक सेवक संदेश घेऊन आला की, महाराज कोणत्या तरी महत्त्वाच्या कामात गुंतलेले असल्यामुळे कुस्ती पाहायला येऊ शकत नाहीत!

राजांचा आदेश ऐकून राजकेसरी मनातल्या मनात म्हणाला, बिचारा राजा! आपल्या पैलवानाची दैना पाहण्याची हिंमत नाहीय म्हणूनच येण्याचं टाळतोय.

काहीच क्षणात राजकेसरी आणि त्या नव्या पैलवानात कुस्ती सुरू झाली. सुरुवातीला काही वेळ नव्या पैलवानाची पीछेहाट होत होती पण थोड्याच वेळात त्याची कुस्तीवरील पकड घट्ट झाली. तो राजकेसरीच्या प्रत्येक खेळीला विजेच्या गतीनं प्रत्युत्तर देऊ लागला. त्याचा डाव त्यावरच उलटवू लागला. नंतर नंतर तर त्यानं असे काही डावपेच टाकले की राजकेसरीच्या पायाखालची जमीनच सरकू लागली. रागाच्या भरात तो चिथावलेल्या वाघासारख्या डरकाळ्या फोडू लागला. पण दुसऱ्या पैलवानावर त्याचा काहीच परिणाम झाला नाही.

शेवटी त्या अभूतपूर्व सामन्याची जयमाला त्या नव्या कुस्तीवीराच्या गळ्यात पडली. प्रेक्षागारात विजयनगरच्या विजयाचा एकच जल्लोष चालला होता. राजकेसरी जमिनीवर निपचित पडून असहायपणे ते सर्व पाहत होता. लोकांनी नव्या पैलवानाच्या गळ्यात पुष्पमाला घालून त्याला खांद्यावर उचललं आणि आखाडाभर फिरवलं.

राजकेसरीला पराजित करणाऱ्या पैलवानाचा सत्कार करण्यासाठी प्रधानमंत्र्याने सेवकाला कृष्णदेवरायांना बोलवायला पाठवलं पण महाराज महालात नसल्याचा निरोप घेऊन तो सेवक परत आला. आता काय करावं ह्या विचारात प्रधानमंत्री बुडून गेले. तेवढ्यात नव्या पैलवानाने त्यांना आपल्याजवळ बोलावलं. आपल्या चेहऱ्यावरचा लेप खसाखसा पुसून टाकला. नव्या पैलवानाचा खरा चेहरा पाहून प्रधानमंत्री आणि बाकी लोक थक्क झाले. तो पैलवान, प्रत्यक्ष कृष्णदेवरायच होते. मंचावर आल्यावर त्यांनी सन्मानसूचक वस्त्रे आणि सोन्याच्या दहा हजार मुद्रा मागवल्या. मान खाली घालून उभ्या असलेल्या राजकेसरीला बोलावून घेऊन त्यांनी त्याचा सन्मान केला.

ह्या वेळेस राजकेसरी रुद्रलिंगमच्या दरबारात परत आला तेव्हा त्याच्या मनात विजयनगरच्या राजाबद्दल कोणतीही वाईट भावना नव्हती. तो मनातल्या मनात म्हणत होता, 'राजाला जाऊन सांगितलं पाहिजे की आपल्या राज्याचं हित कृष्णदेवरायांशी वैर करण्यात नाही, तर मैत्री करण्यात आहे.'

**संपर्क : ९७४१५२५६७३**

# मोबाइलेरिया



चारुलता पाटील

कोण गं आई, हा वेडपट?
एक नंबरचा नादिष्ट!
परवा परवापर्यंत होता म्हणे
हा एक नंबरचा गप्पिष्ट!
रविवारी सकाळी नेमानं जायचा
हा बागेमध्ये रनिंगला
आता कुठे वेळ असतो
याला बागेकडे फिरकायला?
सकाळी उठला की तडक धावतो
नि मोबाईलवर झडप घालतो
चहा होतो गारेगार
घुम्यासारखा एकटाच गेम खेळत बसतो!
कशीबशी आई त्याला
अंघोळीला दामटते
कावळ्यासारखी अंघोळ करून
स्वारी पुन्हा मोबाईल घेऊन बसते!
कधी आईबाबा ओढून नेतात खरेदीला
त्यालाच आणायला नवे कपडे
बिचारे शोधतात शर्ट त्याच्या आवडीचे
तर तिथेही याचं डोकं खुपसलेलं मोबाईलमध्ये!
कधी रात्री येतात मामा-मामी
सर्वांना मस्त गप्पा मारायच्या असतात
पण हा गाठतो हळूच एक कोपरा
बसतो मोबाईल घेऊन हातात
अगं आई, याला झालाय मोबाईलेरिया
म्हणजे मोबाईलचं भयंकर पिसं! ही साधी का गोष्ट?
अरे बापरे!आई, 'तो'मीच तर नव्हे?
कसला गं आई मी भन्नाट छंदिष्ट!!!

संपर्क : ९८९०६१३११८





दिवाकर ठोंबरे

# फुलपाखरू


**१४ मार्च हा जागतिक 'फुलपाखरू दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून फुलपाखरांविषयी काही कुतूहलयुक्त माहिती खास आपल्यासाठी. जागतिक फुलपाखरू दिनाच्या हार्दिक**

पर्यावरणाचा अत्यंत महत्त्वाचे घटक असलेली झाडे जमिनीत मुळे रोवून एकाच ठिकाणी उभी असतात. या झाडांचा प्रसार पक्षी, कीटक, भुंगे अशा अनेक वहकांमार्फत होते. त्यातील एक वाहक म्हणजे फुलपाखरू. ही फुलपाखरे फुलांवरील मकरंद गोळा करण्याच्या उद्‌देशाने अनेक झाडांना भेटी देत असतात. त्या वेळी पंखांना, शरीराला चिकटलेले परागकण, यांचा इतरांशी मेळ होतो. यालाच परागीभवन म्हणतात, हे आपल्याला शालेय वयापासून ठाऊक आहे. पर्यावरण संवर्धन आणि अन्न साखळीत फुलपाखरे, याहूनही जास्त निर्णायक भूमिका बजावत असतात. फुलपाखरांची अंडी हे कित्येक कीटकांचे प्रथिनयुक्त अन्न, तर फुलपाखरांच्या अळ्या ह्या काही पक्षांना विशेष प्रिय! काही मुंग्यादेखील रेडस्पॉट, सिल्वर लाईन इत्यादी फुलपाखरांच्या अळ्यांमार्फत बाहेर पडणाऱ्या मधुरसावर जगतात. पूर्ण वाढ झालेली फुलपाखरू ही जाळं विणलेल्या कोळ्यांचं किंवा सरड्यांचे मुख्य अन्न. राजा, नवाब यासारख्या फुलपाखरांना तर, माणसांचे, प्राण्यांचे मलमूत्र देखील विशेष प्रिय. फुलपाखरांच्या अळ्यांमार्फत बाहेर पडणारी विष्ठा हेदेखील एक उच्च दर्जाचे नैसर्गिक खत असते.



ज्याप्रमाणे घनदाट जंगल व जैवविविधतेने संपन्न असलेल्या प्रदेशात भरपूर पक्षी वास्तव्यास असतात. जंगलाचा दर्जा ठरवणारे एक परिमाण म्हणजे धनेश पक्षी, त्याच प्रमाणे भरपूर प्रजातीची फुलपाखरे एखाद्या ठिकाणी असणे हे, त्या ठिकाणच्या खाद्य वनस्पतींच्या विपुलतेचे द्योतक होय!

फुलपाखरांचा विहार म्हणजे लय व गती यांचा विलोभनीय असा संगम, त्यात पुन्हा भरजरी नक्षीकाम आणि लोभस रंगसंगती लाभलेले पंख! विविध फुलांवर अथवा एकमेकांचा पाठलाग न्याहाळणे हा सौंदर्याविष्कारच, फुलपाखरांचे हे तरंगनृत्य हे केवळ डोळ्यांना नव्हे, तर मनाला देखील पर्वणी देणारं ठरतं. तणावग्रस्त मानवीमन हे फुलपाखरांच्या सानिध्यात सकारात्मक कार्य कशा पद्धतीने करू शकते? मानसिक व्याधींवर उपाय म्हणून निसर्गोपचारात फुलपाखरांच्या सहवासाचा प्रयोग करून पाहायला काय हरकत आहे?



ऐरोली येथील नॅशनल बर्न सेन्टर या इस्पितळात, भाजलेल्या रुग्णांवर उपचार करताना, या रुग्णांना मानसिक आधार देण्यासाठी, इस्पितळाच्याच मोकळ्या आवारात चक्क एक फुलपाखरू उद्यान तयार करण्यात आले आहे!

फुलपाखरांना पुढील बाजूला दोन व मागील बाजूला दोन असे एकूण चार पंख असतात. पंख फायबरयुक्त खवल्यांनी बनलेले असून, त्यांचा जीवनकाळ साधारणपणे पंधरा दिवस ते चार महिने एवढा असतो. या जीवनकालात फुलपाखरे एकूण तीन ते चार हजार किलोमीटर एवढं अंतर उड्डाण करतात. कोषातून बाहेर पडणारे फुलपाखरू हे प्रौढ म्हणूनच जन्मते. पशु, पक्षी, माणूस यांप्रमाणे बालपण, तरुणपण अशा अवस्था त्यांना नसतात. फुलपाखरांच्या आकारात वाढ संभवतच नाही.

एकाच प्रजातीची फुलपाखरे आकाराने लहान मोठी असू शकतात. त्यांचा आकार त्यांच्या अळी अवस्थेतील पोषणावरून ठरतो. रात्री पानांच्या खाली, निश्चल अवस्थेत फुलपाखरे आराम करतात. त्यांच्या डोळ्यांना पापण्या नसल्यामुळे माणसांप्रमाणे ते डोळे मिटून झोप घेत नाहीत. फुलपाखरांना सोंड असते त्यामुळे, ते फक्त द्रवपदार्थ सेवन करू शकतात. अतिरिक्त द्रवपदार्थ ते उत्सर्जन करून शरीराबाहेर टाकत असतात.

फुलपाखरे एकमेकांशी रासायनिक गंधामार्फत संवाद साधतात. नर मादीचे प्रणयराधन, शत्रूचा धोक्याचा इशारा अशा वेळी त्यांच्या शरीरातून एक विशिष्ट प्रकारचा रासायनिक गंध सोडला जातो, आणि 'समझने वाले को इशारा' मिळतो. फुलपाखरांच्या पंखांच्या फडफडण्यावरून कंपने निर्माण होतात व या कंपनांनीही संवाद साधला जातो. फुलपाखरांना साधारणपणे १० ते १२ फूट एवढ्यात अंतरापर्यंतचे कृष्ण- धवल स्वरूपात दिसते. त्यापुढील मात्र त्यांना धूसरपणे दिसते. अतिनील म्हणजे अल्ट्राव्हायोलेट रंग फुलपाखरांना ओळखता येतात. मकरंदाच्या शोधात हेच अतिनीलरंग, त्यांना फुलांचा ठावठिकाणा कळवण्यास मदत करतात. फुलपाखरांना ऐकू येत नाही, पण त्यांना कंप जाणवतो. कंपगतीवरून आणि स्पर्शिकांच्या मार्फत त्यांना शत्रूची चाहूल लागते.

**संपर्क : ९२२१२३३०८३**


# डिझेलगाडी

शेख शफी बोल्डेकर

डिझेलगाडी डिझेलगाडी
जोडीत शहरे खेडीपाडी
रुडॉल्फ असे इंजिन काढी
जमीन, पाणी, हवेत उडी ।।धृ ।।

वाफेवर धावायचे इंजिन
भाचाचे पाणी मामाचा कोळसा
काळ जसा बदलत गेला
तंत्रज्ञानाचा जगी वळसा
कुणी नसावं इथं अनाडी ।।१।।


मॅकमिलन चालवी सायकल
डेम्लर पळवी मोटारसायकल
कार्लबेन्झची मोटार आली
इगॉर सिकोर्स्की घिरट्या घाली
डेव्हिड बुशनेलची पाणबुडी ।।२।।



उन्हाळा, पावसाळा, हिवाळा
तीन ऋतूंचा सुंदर सोहळा
मनी वसे तेच स्वप्नी दिसे
उडती पक्षी पोहती मासे
राईट बंधू विमान काढी ।।३।।
अंदाजे पंचे दाहो दर्से
धीट वाघोबा भित्रे का ससे?
पाऊस पाण्याची गाऊ गाणी
शंख शिंपले जमवा नाणी
सहल निघाली शेतीवाडी ।।४।।
देह धड तर मन धड
वृक्ष जोपवा पिंपळ, वड
चल बाई खेळू फुगडी फू
ताई बाई ताई लंगडी तू
दंगल कुस्त्यांची अडीमोडी ।।५।।
दोन चाकांचा मार्ग लोहाचा
चाकांचा शोध नव्या युगाचा
विज्ञानाचे नवे आविष्कार
चमत्कार हाच नमस्कार
शिंटी फुंकली सुटली गाडी ।।६।।

संपर्क : ७७९८९६७७९३

कोळ्याच्या जाळ्यात कोणकोणते व किती मासे अडकले आहेत शोधा पाहू.



# ती आहे गंगा नर्मदा

प्रा.सुमती पवार

सबला आहे सक्षम आहे, आहे सुदृढ मनी
उभी ठाकते पाय रोवूनी, कधी भासे मर्दिनी
अविचल ती क्षमाशील ती, कष्टाची ती मूर्ती
झाशी, अहिल्या, जिजाऊ बनूनी दिगंती गेली कीर्ती...
सोशिक आहे समंजस ती करुणासागर धात्री
भरभरून ती आपुल्यावरती करते नेहमी प्रीती
किती रूपांनी येते जीवनी व्यापून सर्वदा उरते
विश्वव्यापी जणू परमेश्वर हर एक काम ती करते...
वसुंधरा ती मृदाही आहे, नवनिर्माणाची धनी
बरोबरी हो करू न शकले आजवरी तरी कुणी
तिच्यासारखी तीच आहे हो, आहे खूप सद्गुणी
देवाजागी तिला स्थापिली देवाने म्हणती कुणी...
सागर आहे आकाश आहे ती आहे गंगा नर्मदा
उदार आहे हात तिचा हो देण्या पहा सर्वदा
वृक्ष होऊनी देते सावली जगताला माऊली
ठेचकाळते घर तिच्यावीन खरे... पावलो पावली...
सत्त्वशील ती मर्यादेची आहे पहा खूण
खाण गुणांची आहे तरी ही मारती पहा भ्रूण
तिच्या वाचूनी पान न हलते, चालेना संसार
उणेच करता माता भगिनी संसार असे असार ...
जन हो उघडा, उघडा डोळे नारी विना ना गती
भाग्यवान हो आपण सारे, तिच्यामुळे उन्नती
करा करा सन्मान तियेचा पुण्य बांधा गाठी
देवा आधी उभी राहते, तीच सर्वांपाठी...

संपर्क : ९७६३६०५६४२





# झाडांची भाषा

भाग ३

मनोज बोरगावकर

# कथा सद्गुणाची

तुमची पिढी 'नेट'ने जगाशी जोडली गेली आहे पण नीटपणे जोडली आहे का... याचा विचार करायची वेळ आली आहे. आपण जगाशी जोडले जातोय पण माणसांपासून तुटत चाललोय. आपण एकटे एकटे होत चाललोय , आपल्यातला संवाद संपत चाललाय. आपल्या अवतीभवती निमूट उभी आहेत असे वाटणारी झाडंसुद्‌धा एकमेकांना धरून राहतात... एकमेकांशी संवाद साधत असतात आणि या संवादाची भाषा आहे गंध किंवा वास. आता आपल्यावर झाडांचे अनुकरण करायची वेळ आलीय. ती एका जागीच जरी निश्चलपणे उभी असली तरी त्यांचा सतत परस्परांशी संवाद चालूच असतो. कसा ते आपण बघू या.

आपले जसे एखादे कुटुंब असते, आपला पण एक समाज असतो अगदी तंतोतंत झाडांचंही कुटुंब असतं, समाज असतो आणि एकमेकांच्या साथीने आणि सहकार्यानेच आपण तग धरू शकू; जगू शकू हा विश्वास त्यांना असतो. जंगलातील असंख्य झाडांचाही एक परिवार असतो. माणसांनी त्यांची वारेमाप कत्तल करेपर्यंत हजारो जंगलं जी युगानुयुगे उभी होती ना ती याच संवाद आणि सहकार्याच्या जोरावर बरं का! ही झाडं स्वतःचाच फायदा बघत राहिली असती तर ही जंगलं केव्हाच नष्ट होऊन गेली असती. आपण म्हणतो ना live and let live! जगा आणि जगू द्या. झाडं तर याच्याही पुढे जाऊन विचार करत असावीत. live and live for others. अर्थात जगा आणि इतरांसाठी जगा. किती देखणा आहे नाही हा झाडांचा विचार अनुकरणात आणावा असाच.

फार अद्‌भुत आहे या झाडांचे विश्व. जंगल समूहातील झाडं एकमेकांची काळजी घेतात एखाद्या दुर्बल झाडाला जगवण्यासाठी कोण आटापिटा करतात... कधीकधी तर त्याला वाचवता आले नाही या दुःखात स्वतःही संपून जातात.

आपला असाही समज आहे की जगाच्या या अवाढव्य पसाऱ्यात माणूसच फक्त भाषेचा वापर करून परस्परांशी संवाद साधत असतात. पण असेही अविश्वसनीय शोध लागत आहेत की झाडंपण एकमेकांशी संवाद साधत असतात. एकमेकांना आजच्या भाषेत मेसेज पाठवत असतात. त्यांच्या भाषेचं माध्यम किंवा नाव काय आहे माहीत आहे का तुम्हांला?.... ते माध्यम आहे गंध किंवा 'वास' .... या माध्यमातून ते सतत संपर्कात असतात. त्यांना कधीही आपल्यासारखा नेट पॅक भरून स्वतःला रिचार्ज करायची गरज पडत नाही कारण निसर्गाकडूनच घ्यायचं आणि त्यालाच परत करायचे ही समृद्‌ध जाणीव त्यांना असते. एका उदाहरणाने तुम्हांला मला काय सांगायचेय ते अधिक स्पष्ट होईल. तुमच्या लक्षात झाडांची एसएमएस प्रक्रियापण येईल!

आफ्रिकेतल्या सव्हानाच्या जंगलात शास्त्रज्ञांना एका गोष्टीचा शोध लागला. त्या जंगलात लंबूटांग जिराफ बाभळी सदृश्य झाडांची पान ओरबाडून खातं होती.... आपल्याला असे ओरबाडून खाणे त्या झाडांना अजिबात आवडत नव्हते. तुम्हांला तरी आवडेल का बरं असं कोणी तुमच्या हातातलं ओरबाडून घेतले तर? नाही ना! मग त्या बिचाऱ्या झाडांना तरी ते कसे आवडेल! काही वेळाने त्या बाभळीच्या झाडांनी आपल्या पानांत विषारी द्रव्य सोडायला सुरुवात केली. आपले ओरबाडणे झाडांना आवडत नाही असा संदेश त्या जिराफांना

पोहोचला. ती हिरमुसली झाली आणि लगेच तिथून निघूनपण गेली. पण गंमत इथेच संपत नाही. ती जिराफं त्या झाडांना सोडून बाजूच्या झाडांकडे का वळली नाहीत. याचेही कारण इतके मनोरंजक आहे ना! ज्या झाडांना जिराफ ओरबाडत होते ना त्यांनी काही वेळानं हवेत इथिलिन नावाचा वायू सोडायला सुरुवात केली. हा वायू म्हणजे त्या झाडांचा इतर झाडांना दिलेला संदेश होता. तो संदेश ऐकून नव्हे त्याचा वास घेऊन बाकी झाडांनीही आपली पानं विषारी करायला सुरुवात केली आणि जिराफ निमूट निघून गेले. किती मस्त आहे ना झाडांची गंध भाषा...!

एखादा कीटक जर झाडांची पानं कुरतडत असेल ना तर झाडं आपल्या या गंधाच्याच भाषेचा वापर करून त्या कीटकांना खाणाऱ्या दुसऱ्या कीटकांना आवतन देऊन बोलावतात, आकर्षित करतात. ते कीटक मग यांचा चट्टामट्टा करतात किती भारी आहे ना हे सगळं.

किती अद्‌भुत जग आहे ना हे झाडांचं... खूप काही सांगणारं, शिकवणारं, अनुकरण करावे असेच.

म्हणूनच येता जाता एखाद्या झाडाचं पानफूल, फांदी तोडताना दहावेळा विचार करा. झाडाला आपण विनाकारण इजा करतोय याचे भान असू द्या... आपण पुस्तकं तर वाचतोच... आता झाडंही वाचायला सुरू करू या!

**संपर्क : ९८६०५६४१५४**


**प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट अधिनियम – ११ बी**
**अन्वये प्रसिद्ध करायची माहिती**
**फॉर्म क्र. ४ (नियम– ८ पहा)**

**प्रकाशन स्थळ** : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती' सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ००४.

**प्रसिद्धीचा नियतकाल** : दरमहा

**मुद्रकाचे व**
**प्रकाशकाचे नाव** : श्री. विवेक उत्तम गोसावी

**राष्ट्रीयत्व व पत्ता** : भारतीय
महाराष्ट्र राज्य पाठपुस्तक निर्मिती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर, पु.ल. देशपांडे कला अकादमी, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

**संपादकाचे नाव** : श्री. कृष्णकुमार पाटील

**राष्ट्रीयत्व व पत्ता** : भारतीय
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती' सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ००४.

**मासिकाची मालकी** : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती', पुणे.

मी विवेक उत्तम गोसावी जाहीर करतो, की वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे संपूर्णतः खरी आहे.

१ मार्च २०२३
मुंबई – ४०० ०२५.

**विवेक उत्तम गोसावी**
प्रकाशक

एकनाथ आव्हाड

# कडधान्यांची गोष्ट

मोड आलेल्या कडधान्यांची
गोष्ट सांगते आई
कडधान्यांच्या उसळीबद्दल
सांगते बरंच काही
तोंडाला नसेल चव तर
म्हणे एक गोष्ट करावी
चमचमीत उसळीची चव
एकदा तरी घ्यावी
मोड आलेली कडधान्ये
पचायला असतात हलकी
चवीलासुद्धा मस्त म्हणे
आहारात हवीत नेमकी
वाल, हरभरा, मूग, मटकी
हुलगा, वाटाणा, चवळी
तूर, घेवडा, मसूर, उडीद
नेहमी वापरावीत सगळी


मुबलक त्यात प्रोटिन्स
जीवनसत्त्वे तर भरपूर
पचनक्रिया सुधारून
आजारांना ठेवती दूर
मोड आल्यावर त्यांना ती
आणखी उपयोगी होती
उत्तम तब्येतीसाठी ती
आरोग्यदायी ठरती
आई नुसते बोलत नाही
पदार्थ करते किती
कडधान्यांच्या केवढ्या
तिला येतात पाककृती

संपर्क : ९८२१७७७९६८



अशोक लोटणकर

# वृक्षवल्ली आम्हां सोयरे



कोकणच्या हिरव्यागर्द झाडीत अगदी रस्त्यालगतच 'नवकिरण विद्यामंदिर'ची गजबजलेली शाळा. या शाळेचे, म्हणजेच हायस्कूलचे देशमुख सर दोन-तीन दिवस खूपच मेहनत घेत होते. त्यांचे सहाय्यक शिक्षक त्यांना मदत करीत होते. मुलांना एवढंच समजलं होतं, की सर कुठेतरी सहल काढतायत. बरं या सहलीला मोठी मुलं घेऊन जाणार आहेत असेही समजले होते. मुलांमध्ये देखील उत्सुकता निर्माण झाली होती. शेवटी देशमुख सरांची तयारी झाल्यावर त्यांनी मुलांना बोलावले. सरांनी सहावी, सातवी, आठवी आणि नववी अशा एकूण चार वर्गांतील चार-चार विद्यार्थ्यांची निवड केली होती. म्हणजे एकूण १६ विद्यार्थी होते. त्यातल्या त्यात जे पायी चालण्यात उत्साही आहेत अशीच मुलं त्यांनी निवडली होती. मुख्याध्यापकांनी त्यांना तशी परवानगी दिली होती.

देशमुख सरांनी मग या १६ विद्यार्थ्यांना एका वर्गात बोलावले आणि सांगू लागले- 'हे बघा बाळांनो, उद्या तुम्ही सर्वांनी सकाळी सात वाजता शाळेच्या पटांगणात हजर राहायचे. येताना सोबत भाजी-पोळीचा डबा आणि पाण्याची बाटली घ्यायची. आपण उद्या जंगलवाडीतल्या 'प्रतापकोंडी'च्या माळावर सहलीला आणि वनभोजनाला जाणार आहोत. मानकर सर तुमची हजेरी घेतील... तुम्हांला मदत करतील... आणि मी तुमच्या सोबत आहेच... चला... मग उद्या सकाळी भेटू सात वाजता...'

वनभोजनाच्या बातमीने मुलांचा उत्साह वाढला. शाळेचा सरळसोट रस्ता सोडून आपण जंगलवाडीतून जाणार... प्रतापकोंडीवर जाणार... वेगळं काहीतरी बघणार याचा आनंद होता. पण मग जंगलवाडीच्या शेजारच्या वाडीत राहणाऱ्या रमेशने असेही सांगितले की, 'जंगलवाडीत वाघ आणि बिबट्यांचा वावर असतो. तो कुत्री आणि गाय-वासरांवर हल्ला करतो... असं आमच्या वाडीतले काही जण सांगतात.' वाघ, बिबट्याचे नाव घेतल्यावर अजून उत्सुकता आणि थोडी भीतीही वाटू लागली होती.

सकाळी पावणेसात वाजताच ही उत्साही मुलं शाळेच्या पटांगणावर हजर झाली. एव्हाना, शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांना ही निवडक मुलांची जंगलातली सहल समजली होती. अर्थातच त्यांचीही उत्सुकता वाटली होती.. पटांगणावर हजर झालेल्या सर्व मुलांची हजेरी मानकर सरांनी घेतली. प्रत्येक जण जंगल सफरीसाठी तयार होता. पायात कॅनव्हास शूज, पाठीवर सॅक त्यात पाण्याची बाटली, जेवणाचा डबा, डोक्यावर कॅप... अशा थाटात असणाऱ्या मुलांना देशमुख सरांनी सांगितले-

'आपण आता शाळेचा मुख्य रस्ता ओलांडून धुरळ्याच्या रस्त्याने जंगलवाडीतून जाणार आहोत.. पुढे पायवाट असेल. वाटेत झाडं-वेली, रानटी वनस्पती लागेल. काट्याकुट्यांतून चालताना काळजी घ्यायची. दगड गोट्यांवर अलगद पाय ठेवायचा. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे... तुम्हांला जे जे म्हणून दिसेल ते लक्षात ठेवायचे. मग झाडं, वेली, फुलपाखरे, चिमण्या, कावळे, गाई-गुरं, वेगवेगळे पक्षी-प्राणी जे जे दिसेल ते पाहायचे. कोणाच्या लक्षात नाही राहिले तर छोट्या कागदावर काय पाहिले ते पेन्सिलने लिहा.. मग आपण प्रतापकोंडीच्या माळावर यावर चर्चा करू....'

देशमुख सरांच्या सूचना संपल्यावर सर्व जण देशमुख सरांच्या मागोमाग चालू लागले. शेवटी मानकर सर होते. मुख्यरस्ता सोडून जंगलवाडीचा धुरळ्याचा रस्ता, तर आत पायवाट दिसू लागली... चालता चालता डोळ्यांसमोर नयन मनोहर दृश्य पाहून मुलं आनंदली. रस्त्यालगत आणि आत रानात काजूंना बहर आलेला.. तर आंब्याच्या मोहराने आसमंत सुगंधित झालेला. वाटेत करवंदीच्या जाळी. करवंदीवर पांढरीशुभ्र फुले, तर त्यातून डोकावणारी हिरवीकंच कोवळी करवंदे पाहून मुलांना करवंदे तोडण्याचा मोह झालाच. त्याच वेळी मोहोराच्या मागे जाणारी विविध रंगांची फुलपाखरे, चिमण्या, कावळे, आंब्याच्या झाडावर पोपट, गरुड, खाली बुंध्यावर खारूताई, जाळीतून सरसरणारा सरडा, सरड्याचा बदलणारा रंग... हे सारं मुलं पहात होती. काही जण कागदावर लिहित होती. मध्ये मध्ये थांबून पाणी पीत... मुलांना झाडं वेली आणि पक्ष्यांची माहिती नावे सर सांगत होते. रानात फिरणारी गाय, बैल, वासरं दिसत होती. रानातून चालताना मुलांना रानकोंबडी दिसली. झाडाच्या ढोलीत टिकटिक आवाज करत ढोली तयार करणारा 'सुतारपक्षी' दिसला. छोटे छोटे कवडे, रानपाखरे... तर वाट ओलांडून जाणारी मुंगसे दिसली. सरांनी थांबायला सांगितले. प्रथम मोठे



मुंगूस... त्यानंतर पाठोपाठ दोन पिल्ले आणि शेवटी बहुधा मादी मुंगूस असावे. पाण्याच्या शोधात, प्रतापकोंडीच्या दिशेने ती जात असावीत, असे सरांनी सांगितले. जंगलातून पळणारा एक कोल्हा काहींच्या नजरेस पडला...

जंगल फिरत फिरत शेवटी दुपार झाली. मुलं प्रतापकोंडीवरच्या माळावर एका झाडाखाली थांबली. झाडाजवळ वारुळं होती.. आत बाहेर मुंग्या होत्या. झाडाच्या मोठ्या फांदीच्या सावलीखाली जागा साफ करून मुलं बसली. भूक लागली होतीच. पोळी, भाजी, कांदेपोहे, शिरा... देवाणघेवाण झाली. थोडा वेळ मुलांनी झाडाखाली विश्रांती घेतली... काही जण खेळले... काहींनी गाणी म्हटली... मग देशमुख सरांनी सर्वांना एकत्र बोलवले... आणि सांगू लागले.

'बाळांनो... आज तारीख किती?' मुलांनी पटकन सांगितली २१ मार्च. सर म्हणाले 'अगदी बरोबर...' आणि पुढे बोलू लागले, 'मुलांनो... आज २१ मार्च हा दिवस 'जागतिक वन्य दिन' म्हणून घोषित केलेला आहे. आपण या छोट्याशा जंगलात पाहिलं की सृष्टीतील प्राणी, पक्षी, किटक विविध प्रकारची झाडे, वेली यांची विविधता वर्णनापलीकडे आहे. पण आपण काय करतो...? निसर्गाची कत्तल करून त्यांचा जगण्याचा हक्क हिरावून घेतो... वन्य प्राण्यांची शिकार करतो... चोरटा व्यापार केला जातो. असे केले तर निसर्ग आणि वन्य प्राणी, पशू यांचे अस्तित्वच नष्ट होईल... यासाठी संपूर्ण जगभर जागृती करण्यासाठी 'युनो' म्हणजेच संयुक्त राष्ट्रसंघाने 'नामशेष होण्याचा धोका असलेल्या वन्यसृष्टीच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर बंधन आणणारा कायदा' संमत केला आणि १८० देशांनी मान्य केला.

सर म्हणाले, 'बाळांनो... कळतंय ना... मी काय सांगतोय ते...'

मुलं म्हणाली, 'होय सर... वन्य प्राणी आणि झाडं, जंगलातले पक्षी सुरक्षित राहिले पाहिजेत...'

सर म्हणाले, 'बाळांनो... गावातून किंवा मोठ्या अरण्यातून जंगली पशू-पक्ष्यांची जी शिकार केली जाते... किंवा चोरटा व्यापार केला जातो... तो तिथल्या स्थानिक लोकांच्या मदतीशिवाय शक्यच होणार नाही... हे आपण लक्षात ठेवायला हवे... आणि घरी तसे सांगायला हवे... 'देशमुख सर पुढे सांगू लागले,' मुलांनो लक्षपूर्वक ऐका आणि ध्यानात ठेवा... निसर्गाच्या साखळीतला प्रत्येक घटक अगदी छोट्या छोट्या रानकिड्यांपासून सिंहापर्यंत पृथ्वीवरील जीवसृष्टीसाठी महत्त्वाचा आहे. वन्यजीव म्हणजे वनात, जंगलात राहणारे जीव-प्राणी, वनस्पती, किटक, पक्षी, वृक्ष आणि एकूणच सर्व जीवमात्र. जगभर ३ मार्च हा दिवस 'जागतिक वन्यजीव दिन'म्हणून साजरा केला जातो. या दिवशी वन्यजीवांचे रक्षण, संवर्धन, त्यांचे अन्न साखळीतील महत्त्व अधोरेखित होते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या २०१३ च्या अधिवेशनात ३ मार्च हा दिवस अधिकृतपणे वन्यजीव दिन म्हणून घोषित झालेला आहे.'

ही सर्व नवी माहिती ऐकून मुलं आश्चर्यचकीत झाली. वन्यजीवांचे आणि वनस्पतींचे रक्षण आपण करायलाच हवे अशी खूणगाठ बांधत मुले प्रतापकोंडीच्या माळावरून परतत होती.

**संपर्क** : ९२२४३७०१२४

# कुतूहल

अमित डहाणे

'किशोर' मित्रांनो,
'किशोर' फेब्रुवारी २०२३ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे 'किशोर'कडे २५ मार्च २०२३ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत किंवा ई-मेल करावा.

संपर्क : ९४२१०५०३८८

**१) IPLच्या इतिहासात सर्वात महागडा ठरलेला खेळाडू सॅम करन कोणत्या देशाच्या संघाचे प्रतिनिधित्व करतो?**
१) ऑस्ट्रेलिया २) द.आफ्रिका
३) इंग्लंड ४) श्रीलंका

**२) खालीलपैकी कोणत्या धान्याचा समावेश भरडधान्य या प्रकारात होतो?**
१) गहू २) तांदूळ
३) मैदा ४) ज्वारी

**३) मिशन इनोव्हेशन ही योजना कशासंबंधी आहे?**
१) मोबाईल नेटवर्किंग
२) इलेक्ट्रिकल वाहने
३) स्वच्छ इंधन
४) शेतीसाठी

**४) खालीलपैकी कोणत्या गीताची निवड महाराष्ट्राचे 'राज्यगीत' म्हणून करण्यात आली आहे?**
१) गे मायभू तुझे मी
२) मराठी असे आमची मायबोली
३) गर्जा महाराष्ट्र माझा
४) मंगल देशा, पवित्र देशा

**५) नुकत्याच पार पडलेल्या इंडियन सायन्स काँग्रेसचे यजमानपद कोणत्या विद्यापीठाने भूषवले?**
१) पुणे २) अमरावती
३) औरंगाबाद ४) नागपूर

**६) लोकपालच्या धर्तीवर लोकायुक्त हा कायदा महाराष्ट्रात तयार करण्यात आला. या कायद्याचा उद्देश काय?**
१) न्याय पद्धतीत सुधारणा
२) प्रशासनातील भ्रष्टाचार कमी करणे
३) शालेय शिक्षणात सुधारणा
४) प्रशासनात लोकांचा सहभाग वाढवणे.

**७) 'फुटबॉलचा देव' अशा बिरुदावलीने ओळखले जाणारे 'पेले' हे कोणत्या देशाच्या संघाचे नेतृत्व करत होते?**
१) अमेरिका २) ब्राझील
३) इंग्लंड ४) पेरू

**८) 'विश्व ब्रेल दिवस' म्हणून कोणता दिवस जगभर साजरा करण्यात येतो?**
१) ४ जानेवारी २) १५ जून
३) २६ जानेवारी ४) १ मार्च

**९) राष्ट्रीय समुद्रविज्ञान संस्थेचे मुख्यालय कोणत्या ठिकाणी आहे?**
१) विशाखापट्टणम् २) मुंबई
३) गोवा ४) बंगळुरू

**१०) जगातील सर्वात मोठे हॉकी स्टेडियम कोठे उभारण्यात आले आहे?**
१) रुरकेला (OR) २) कोलकता (WB)
३) मुंबई (MH) ४) कोची (KER)

**११) 'हिंदकेसरी' २०२२ चा मानकरी कोण ठरला?**
१) सोम वीर २) दत्तू भोकर
३) अभिजीत कटके ४) हरीश चौगुले

**१२) भारतातील सर्वात लांब प्रवास करणाऱ्या रिव्हर क्रूझचे नाव काय?**
१) गंगा विलास २) गंगा जल विलास
३) गंगा-भ्रमण ४) नमामि गंगे

**१३) नुकतेच निधन झालेले डॉ.विश्वास मेहेंदळे कोणत्या क्षेत्राशी संबंधित होते?**

१) नाट्य क्षेत्र २) चित्रकला

३) दूरदर्शन वृत्तनिवेदन ४) क्रीडा

**१४) 'नाटूनाटू' या गाण्याला मिळालेल्या 'गोल्डन ग्लोब' पुरस्कारामुळे RRR हा सिनेमा चर्चेत आला आहे. त्याचे दिग्दर्शक कोण आहेत?**

१) एस.राजामौली २) मणिरत्नम

३) राजकुमार संतोषी ४) करण जोहर

**१५) 'जंगलातील दूरचा प्रवास' ही बालकादंबरी कोणत्या लेखकाने लिहिली आहे?**

१) मंगेश पाडगावकर २) भारत सासणे

३) राजा दीक्षित ४) सदानंद मोरे

---

## जानेवारी २०२३ च्या चित्रकोड्याचे उत्तर




## कुतूहल जानेवारी २०२३ यशस्वी स्पर्धक

**कु. साक्षी पाईकराव, कु. सुवीर फडे**

## कुतूहल फेब्रुवारी २०२३ ची उत्तरे

| | | |
|---|---|---|
| १) ३ | २) २ | ३) ३ |
| ४) ३ | ५) ४ | ६) ३ |
| ७) १ | ८) ३ | ९) २ |
| १०) ४ | ११) १ | १२) १ |
| १३) ३ | १४) ४ | १५) १ |

## चित्रकोडे जानेवारी २०२३ – यशस्वी स्पर्धक

**पुणे –** कु. ईधांत दांडेकर

**सातारा –** कु. शौर्य सरगडे, कु. सुवीर फडे, कु.श्रावणी चव्हाण, कु.तन्वी लंकेश्वर, कु.निवेदन चौरे, कु.मोक्षद सोनावणे, कु.सोहम चौगुले, कु.प्रज्ञा बनसोडे, कु.शमिका पोळ, कु. सई जंगम, कु.स्वराली जाधव, कु.वैष्णवी सावंत, कु.सई मांढरे, कु.सुश्मित साळवेकर, कु.पियुष कचरे, कु.प्रणाली जाधव, कु.अथर्व राजपुरे, कु.वीरजा साळी, कु.उज्मा बागवान, कु.अनुष्का इथापे, कु.वरद साळी, कु.आदित्य तांबे, कु.आर्यन सरक, कु.नंदिनी घोरपडे

**सांगली –** कु. जनार्दन गुगवाड

**अमरावती –** कु. मयुरी वाघाडे

**ठाणे –** कु. रोहित भोईर

**मुंबई –** कु. अयांश कुलकर्णी

**अकोला –** कु. राजनंद अरखराव, कु. युक्ता देशमुख

**अहमदनगर –** कु. शौर्य आठरे, कु. श्रद्धा शिंदे, कु. समीक्षा हासे, कु. प्रेम झंवर, कु.अपेक्षा कदम, कु.श्रेया उदमले, कु.निरजा कुलकर्णी

**चंद्रपूर –** कु.श्रावणी गेडासे, कु.लक्ष खारकर, कु.कुलदिप लिल्हारे, कु. सोनल लिल्हारे, कु. रागिणी लिल्हारे, कु.हमेरा लिल्हारे, कु.वेदांत भोयर, कु.रचना लिल्हारे, कु.अक्षरा डाहारे, कु.वेदीका लिल्हारे, कु.भुवेश ठाकरे, कु.जयकांत ठाकरे, कु.समीक्षा लिल्हारे, कु.संस्कृती लिल्हारे, कु.कुणाल लिल्हारे, कु.मातवी गेडाम

**बुलढाणा –** कु.सार्थक कोथळकार

**जालना –** कु.शिवानी जाधव,

**सिंधुदुर्ग –** कु. संचिता पालयेकर, कु. केदार सावंत, कु. ईशान नाईक, कु.अथर्व आजगांवकर, कु.रिया पिरणकर, कु.पूर्वा जाधव, कु.वेदांत कदम, कु.प्रद्यूत पालयेकर, कु. ओम देऊलकर

**कोल्हापूर –** कु.अर्जुन मंदरे

**रत्नागिरी –** कु.सोहम अभ्यंकर, कु. सुमुख केतकर

**रायगड –** कु.रूद्र पारधी, कु.पियुष गुलगुले, कु.श्लोक बाईत, कु.तनुश्री बोरकर

**लातूर –** कु.अनुजा होनराव

**वर्धा –** कु.टिना मेंढुले

# भावी आधारस्तंभ

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.


* तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
* जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
* ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हालाही वाटते ना?

**मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ', तुम्हाला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु.५/–चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.**



'किशोर मासिक'हे माझे अतिशय आवडते मासिक आहे. ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर मागील तीन महिन्यांपासून हे मासिक मला येत आहे. Registered RNI No-२२६७९/७२ हा आहे. भावी आधारस्तंभ, कुतूहल हे फार आवडते कारण ह्यामध्ये सहभागी होण्याची संधी आहे. मी माझ्या वर्गशिक्षकांना हे मासिक दाखवून त्यांचेकडून चित्रकोडे–कुतूहल तपासून घेते ते अगदी बरोबर असते. माझ्या वर्गशिक्षकांनी मला हे पुस्तक सर्व विद्यार्थ्यांना (बालमैत्रिणींना)वाचायला देत जा असे सांगितले. मी त्यामुळे कसलाही विचार न करता प्रत्येकाला हे मासिक वाचण्यासाठी देते. हे जेव्हा माझ्या मम्मी पप्पांना कळले तेव्हा त्यांनी माझे कौतुक केले. माझ्या वर्गातील मुलेमुली परिस्थिती गरीब आहेत. त्यांच्याकडे सभासद/वर्गणीदार होण्यासाठी पैसे नसतात. आपल्या जवळची विद्या इतरांना दिल्यास आपली विद्या आपोआप वाढते. बुद्धीचा विकास होतो, प्रगती होते. ही गोष्ट माझ्या वर्गशिक्षक आणि मुख्याध्यापक यांना माहीत होताच त्यांनी मला शाबासकी दिली व कौतुक केले.

**कु. साक्षी शंकर पाईकराव**
इ.५वी, जि.प.प्रा.शाळा, रांजणगाव (शे.पु.),
ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ४३११३६
संपर्क ९०२२२०५०८७



आमची शाळा नदीच्या पलीकडे आहे. रोज आम्ही सात जण मित्रमैत्रिणी आमच्या वस्तीवरून पवारवाठी शाळेस कोरडा नदी ओलांडून ये–जा करतो. हे अंतर दोन किमी आहे. एके दिवशी शाळा सुटल्यानंतर आम्ही रमतगमत घराकडे येत असताना नदीजवळील झाडातून मांजराच्या पिल्लाचा आवाज ऐकू येत होता. माझ्या मित्राने आणि मी त्या पिलास अलगद झाडीतून उचलून बाहेर काढले. ते खूप भ्यायले होते. त्याच्या अंगास दोन ठिकाणी जखमाही झाल्या होत्या. त्यास मी घरी घेऊन आलो. गरम पाण्याने त्याच्या जखमा धुऊन घेतल्या. त्यास आईच्या मदतीने औषध लावले, त्या पिलास दूध पाजले. नंतर त्यास माझ्या खोलीत मऊ कपड्यावर झोपवले. आता ते पिल्लू आमच्या घरातील सर्वांचे लाडके झाले आहे. आम्ही त्याच्याशी रोज चेंडू, छोट्या वस्तू पकडापकडी खेळतो. खूप आनंद मिळतो.

**कु. संचित संतोष साळुंखे**
इ. ४थी, जि.प.प्रा.शाळा, पवारवाठी (कडलास),
ता.सांगोला, जि.सोलापूर ४१३३०७



मी, माझा भाऊ आणि माझे वडील धर्मापुरी येथे राहतो. आमच्या गावाच्या शेजारी हाळम व येळम हे दोन गावे परळीच्या रस्त्यातच आहेत. येळम येथे जत्रा भरली होती. आम्ही ती जत्रा पहायला व खंडोबाचे दर्शन घ्यायला गेलो होतो. मंदीरात दर्शनासाठी खूप गर्दी होती तेवढ्या गर्दीत मला एक लहान मुलगी सापडली व मी तिला पाहिले ती रडत होती. मी माझ्या वडलांना सांगितले. त्यांनी मंदिराच्या शेजारी पाहिले तर तिचे कुटुंबीय आम्हांला दिसत नव्हते. काय करावे हा प्रश्न पडला. तेवढ्यात माझ्या लक्षात आले की तेथे मंदिराच्या देणगीसाठी माइकवरून पुकारत होते. मी माझ्या वडलांना सांगितल्यावर आम्हीही माइकवरून पुकारले. खूप वेळ झाला पण कोणी आले नाही. आम्ही मंदिराच्या जरा लांब गेल्यावर त्या मुलीने जाऊन एका आजीला तिने घट्ट धरले. आम्ही त्या आजींकडे गेल्यावर त्या आजींना विचारले ही मुलगी तुमची कोण आहे. त्यांनी मला सांगितले की ती मुलगी त्यांची नात आहे. तेव्हा मला बरे वाटले. त्यांनी मला शाबासकी दिली व त्या निघून गेल्या.


**कु. समीक्षा हरिश्चंद्र क्षीरसागर**
जिजामाता विद्यालय धर्मापुरी,
मु.पो.धर्मापुरी, ता.परळी(वै),
जि.बीड ४३१५१५




मला पक्षी खूप आवडतात. एके दिवशी मी माझ्या मम्मी-पप्पांबरोबर दोधेश्वरला गेली होती. मी तेथे नदीच्या काठी गेली होती. तेव्हा एक पक्षी झाडाखाली पडलेला होता. मी ते पाहिले. मी त्या पक्ष्याला माझ्या हातात घेतले. तेव्हा मी पाहिले की त्याच्या पायाला लागलेले होते. मी त्याला बाकावर बसवले व मी दुकानातून हळद घेऊन आले आणि त्याच्या पायावर लावली. मी त्याला पाणी पाजले व त्याला खायला दाणे दिले. मी त्याला झाडाजवळ सोडून आले. थोड्या वेळात तो पक्षी उडून गेला. एकदा मी गच्चीवर गेली होती. खिडकी उघडी होती. तेव्हा घरात दोन चिमण्या आल्या. मी जेव्हा गच्चीवरून खाली आली तेव्हा मी पाहिले की चिमण्यांना बाहेर जाण्याचा रस्ता मिळत नव्हता. मग मी सगळे दरवाजे उघडले. तेव्हा माझे मम्मी-पप्पा घरी आले होते. माझ्या मम्मी-पप्पांनी माझे खूप कौतुक केले. मी हे माझ्या श्री.किरण देशमुख सरांना सांगितले. माझ्या सरांनी माझे खूप कौतुक केले व माझ्या या कामगिरीबद्दल त्यांनी परिपाठाच्या वेळी सर्व मुलांना ही गोष्ट सांगितली. तसेच मला बक्षीसदेखील दिले.


**कु. सायली रवींद्र बगडाणे**
स्वामी विवेकानंद बालविकास मंदिर,
चौगाव, ता.बागलाण,
जि.नाशिक ४२३३०१

# उमलती प्रतिभा

## फुलपाखराला विचारू प्रश्न

१. फुलपाखरा, तुला माझ्याशी भेटून कसं वाटतंय?
२. तुला उडताना मज्जा वाटते का?
३. तुला उंच उडता येते का?
४. तुला एवढे रंग कसे काय आहेत?
५. तुला फुलांचा सुगंध इतका का आवडतो?
६. तुला जर कोणी हातात पकडले तर तुला आनंद होतो की दु:ख होतं?
७. तुला कोणकोणत्या फुलांचा सुगंध जास्त आवडतो?
८. तू दिवसभर काय-काय करतो?
९. तुला भूक लागल्यानंतर तू काय-काय खातोस?
१०. तुझे आई-बाबा कोठे राहतात?
११. तुला आमच्यासारखे नातेवाईक आहेत का?
१२. तुला आमच्यासारखे मित्र आहेत का? तू त्यांच्यासोबत खेळतोस का?
१३. तुला मुलं आवडतात का?का आवडतात?
१४. तुला कोणता ऋतू सर्वात जास्त आवडतो?
१५. वारा वाहतो तेव्हा तुला गुदगुल्या होतात का?
१६. तुझा माझ्यासारखा वाढदिवस साजरा करतात का?
१७. तुला माझ्यासोबत मैत्री करायला आवडेल का?
१८. तुला माझ्यासोबत माझ्या घरात रहायला आवडेल का?
१९. तुला इतकं सुंदर असं रूप कोणी दिलं?
२०. तुला आमच्यासारखं तुझे आई-बाबा मारतात का?
२१. तू तुझ्या मित्रांशी खेळतोस का?
२२. तू तुझ्या झाडावर बसलेला असतो तेव्हा अचानक पाऊस आला तर तुला मजा येते का?
२३. तुला आमच्यासारखी शाळा आहे का?
२४. तुला आमच्यासारखी गोष्टींची पुस्तके व त्यांतील परीकथा वाचायला आवडतात का?
२५. रात्री तू काय करतोस?
२६. तुला उंच हिरव्यागार डोंगरावर जायला आवडते का?

**कु. सिद्धी तोरकड, कु. तृप्ती अस्वले**
इ. ६वी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वीरगाव



**कु.अमित रविकांत बनबरे,** इ.९वी, श्री. ज्ञानेश्वर विद्यालय, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे ४१२१०५



**कु.नम्रता प्रदीप पिलांत्रे,**
जि.प.व प्राथमिक मराठी शाळा, खंडाळा ४४४१०३



**कु.रिद्धी दामोदर नारकर,** जि.प.पू.प्राथमिक शाळा, सौंदळ नं ३, ठिकाणकोंड, मु.पो.सौंदळ, ता.राजापूर, जि.रत्नागिरी

# सेंद्रिय शेती-आधुनिक काळाची गरज

आजच्या बदलत्या शेती पद्धतींमध्ये नवनवीन प्रयोग होत आहेत. अनेकदा संकरित बियाणे रासायनिक कीटकनाशके व खतांची निर्मिती होत आहे. उत्पन्न वाढवण्यासाठी शेतकरी रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा अमर्याद वापर करीत आहेत.

आधुनिक बियाणांमुळे पारंपरिक बियाणांच्या जाती नष्ट होऊ लागल्या आहेत. रासायनिक कीटकनाशकांच्या व खतांच्या अतिरेक वापरामुळे मानवी आरोग्यावर दुष्परिणाम होऊ लागले आहेत. या सर्वांना पर्यावरण पूरक सेंद्रिय शेती हा उपाय पुढे येत आहे.

पर्यावरण आणि आर्थिक अशा दुहेरी हेतूने सेंद्रिय शेतीचा मोठ्या प्रमाणात विस्तार होणार आहे. हे लक्षात घेऊन संशोधन, प्रशिक्षण, प्रमाणिकरण, शेतामालाचे मूल्यवर्धन व विकास या बाबींना प्राधान्य देऊन सामाजिक बांधिलकी जोपासणे आवश्यक असल्याने सध्याच्या युगात सेंद्रिय शेती करणे नितांत गरजेचे आहे.

गेल्या काही वर्षांत रासायनिक कीटकनाशकांच्या सतत बेसुमार वापरामुळे कीटकनाशकांचे काही अंश फळे, भाजीपाला, अन्नधान्यामध्ये दिसू लागले आहेत. रासायनिक कीटकनाशकांच्या व खतांच्या माध्यमातून कर्करोगाचे प्रमाण वाढत असल्याची बाब काही सर्वेक्षणानंतर पुढे आली आहे.

या सर्व प्रकरणाला पाय बंद घालण्यासाठी सेंद्रिय व रासायनिक अवशेषमुक्त शेती करण्याचे आवाहन केले जात आहे. या सर्व गोष्टींचा शेतकऱ्यांना विश्वास पटल्याने आता ते सेंद्रिय शेती करण्याकडे आकर्षित होऊ लागले आहेत.

शेतात जमिनीचा पोत टिकवून ठेवण्यासाठी योग्य त्या ठिकाणी बांध घालणे, मशागत करणे, शेत व गोमूत्राचा जास्त वापर करणे ज्यामुळे पाणी वाफ्यात, टिकून राहते. बैल मशागतीने नांगरणी करणे, नांगरणी उत्तम प्रकारे झाल्यास पिकांची वाढ चांगल्या प्रकारे होते. अशी शास्त्रोक्त पद्धतीने शेती केल्यास पीक उत्पन्न वाढेल आणि सहकारी सावकऱ्यांच्या दुप्पट व्याजाच्या चक्रातून शेतकरी मुक्त होतील.

**रिया वाहिद मुलाणी**
इ. ७ वी, जि.प.प्राथमिक शाळा
मरळी केंद्र-इंदोली, बीट-उंब्रज, ता.कराड, जि.सातारा ४१५१०९

# सुंदर झेंडूचे फूल

जसे झेंडूचे झाड सुंदर तसे झेंडूचे फूल पण सुंदर. त्या फुलाच्या पिवळ्या-पिवळ्या पाकळ्या आणि त्याची कळी तर खूपच सुंदर. छोटीशी इवलीशी हिरवीगार झेंडूची कळी. माझ्या आईने एक झेंडूचे झाड लावले. मी वाटच बघायची कधी ही कळी खुलणार तर. एक दिवशी ते कळी खुलणार होती. त्या कळीची एक-एक पाकळी हळूहळू खुलू लागली. माझ्या आईने मला खाली जेवण करायला बोलावले. मग मी जेवण करून त्या फुलाला बघायला वर गेली. तेवढ्यात चमत्कारच झाला त्या कळीचे फूल झाले.

**कु खुशी देवराव उभे**
इ.६वी, जि.प.व.प्राथ.शाळा खंडाळा,
ता. तेल्हारा, जि.अकोला

# पाठलाग

घनश्याम देशमुख
संपर्क ९८२३४१३६२९




दगडू, काहीतरी गडबड आहे. मी गावात जाऊन माझ्या पहिलवान काकाला घेऊन येऊ का?
अरे, इतका वेळ नाही आपल्याकडे. चल, लवकर नाहीतर तो निघून जाईल.
कुठे गेला आता हा?
जाऊ दे रे... चल घरी जाऊया...
नको, मी कपिलेला घेतल्याशिवाय घरी येणार नाही.
दुपार झाली, रात्र होईल, कुठे शोधणार आपण तिला?
त्या माणसाचा पाठलाग केला असता तर तो नक्की आपल्याला गाईजवळ घेऊन गेला असता.
तो बघ तिकडे... कुणीतरी...
क्रमशः



भानुदास धोत्रे

# आभाळाच्या मुली

आभाळीच्या तारकांशी, पाहू जरा बोलून
उंच उंच कितीतरी, कोण धरतंय तोलून?

कोण तुमचे आई बाबा, कोण तुमचे भाऊ?
सूर्योबाच्या प्रकाशात, म्हणती नका न्हाऊ

काळ्याकुट्ट अंधारात, निघता तुम्ही बाहेर
सासर तुमचं कुठलं? नि कुठलं बाई माहेर?

अंधाराची तुम्हां भीती, वाटत नाही कशी?
केवढा मोठ्ठा तुमचा गावं, किती त्याला वेशी

लुकलुक डोळे तुमचे, आम्हां लुभावती
आभाळाच्या मुली तुम्ही, आभाळी शोभती



संपर्क : ७९७२६२५०८६

## इंग्रजी विभाग

# ANGER....

Atul N.Shirude

The dangerous word
Named "anger"
Always transforms us
Into a stranger
It comes
Just for a moment
But surely affects
Our futuristic development
Someone said
Truly with dare
One who controls anger
Is just like fighting a tiger
For our
Better future
We must have
Control over anger
So be patient
And be cool
So that our life
Will be beautiful

**Contact : 9665033908**



Anita Mehar Dadhe

# The Unknown Guest

One day Aai came from school and showed a few pictures to Arya on her phone. There was a nest in the pictures. It was not an ordinary nest. The nest was woven by leaves. Arya and Jai were as surprised as Aai because they hadn't seen this type of nest before.



Aai, Arya and Jai loved to observe nature. Arya always discussed plants, animals, and birds with Aai and Jai. So after seeing this new nest, she told Aai to observe it every day. She asked Aai to take more pictures.

After 2-3 days Aai saw three small brown eggs in the nest, but she couldn't see the weaver. On the same night, there was heavy rainfall with thunders and storms for two days. It was August. Arya worried about the bird, eggs, and nest. When the rain stopped they went out to see it. Aai found the nest scattered. They felt very sad about the bird.

A few days passed. One morning Arya rushed to Aai and insisted she sees the bird chirping in the window. It was a small bird with a green upper part and yellow white at under. It seemed that it was searching for something with the sound "Pichi-pichi". They were watching it for the first time.

After some days, Aai saw a nest woven into

the money plant climber just like she found at school. Arya observed that it was not alone - there were two birds. They both stitched two leaves in such a way that no one could see them. They were using their long slender beak. For some days Arya didn't see the bird so she thought the birds didn't like to stare at them. Now they left the nest. Aarya got upset again.



After 10-13 days, when Aai was watering the plants she heard a low noise. There were three young ones in the nest. Arya wished to see that but Aai refused by saying that the bird wouldn't like it. Aai told Arya about the bird. “This is a common tailor bird, which builds its nest between April to September. It lays 3-4 eggs at a time.‘Orthtomeus Sutorious’ is its scientific name.” Arya was hearing very eagerly and promised Aai to gather more information about ‘The tailor Bird’.

Now Arya got an important job observing the bird, nest, and young ones. She told her cousins, school friends, and her teacher too. One morning when she was climbing down for school, she saw that the young ones came out from the nest. Now they are looking like the tailor bird. She told Aai to play with them after coming from school. In school, she was dreaming about the young ones and she was playing. When she reached home she didn’t find them. She searched them here and there but in vain. She got disappointed.


When Aai came from school she has already made up her mind. She explained, “The young ones are adults now. They went out to search for a new place for their own nest. Now they are free to fly in the sky, to tweet, to experience to fulfill their dreams. So don’t get upset.”

Now, whenever Arya looks at the sky, she finds so many birds spreading their wings and making their dreams true. The unknown guest not only stitched a nest but made a special place in Arya’s heart.


# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh

Help the butterfly to reach the flowers



Step by Step
How to Draw



# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

हे चित्राचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.




## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.

२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ मार्च २०२३.

३) कोड्याचे उत्तर एप्रिल २०२३ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

**Registered** R.N.I.NO. 22679/72

Kishor (Marathi) Postal Regd.No. PCW/076/2021-2023 Registered Newspapers posted at PUNE PSO, GPO- 411 001
The date of publication 26.02.2023 Posting on 27th & 28th February 2023
License to Post without prepayment of postage No. WPP-53







**कथा, कविता, कादंबरिका, एकांकिका, दीर्घकथा, गंमतगाणी, ललित, छंद, चरित्र, विज्ञान, देश-देशांतर, लोककथा**

लोकप्रिय व अभिरुचिसंपन्न किशोर मासिकातील चाळीस वर्षांतील निवडक साहित्यांवर आधारित 'निवडक किशोर'चे १४ खंड


किंमत प्रत्येकी ₹ १६३/- (३०% सूट)

**वरील खंड पाठ्यपुस्तक मंडळाच्या सर्व भांडारांत विक्रीसाठी उपलब्ध आहेत. १४ खंडांची एकूण किंमत ₹ १६००/-**

किशोर





**If not delivered please return to :**

संपादक, 'किशोर' मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
'बालभारती', सेनापती बापट मार्ग,
पुणे – ४११ ००४.
दूरध्वनी : ०२० – २५७१६२४४
ई–मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in

प्रति,